


# मुमु

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय सा. वा.
दा. क्र. ९९६६

## इवान तुर्गेनेव

IRBK-0106966

...एच. बुकस्टॉल, मुंबई-४

# मुमु

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ६२६६
वि. ५१।५१ क्र.

: लेखक :

इवान तुर्गेनेव

IRBK-0106966

पी. पी. एच. बुकस्टॉल,
मुंबई ४.

पहिली मराठी आवृत्ति : मार्च १९५८

[ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन ]

अनुवादक : प्रभाकर ऊर्ध्वरेषे

किंमत ७५ नये पैसे

जयंत भट यांनीं न्यू एज प्रिंटिंग प्रेस, १९० बी, खेतवाडी मेन रोड, मुंबई ४ येथें छापून त्यांनीं पी. पी. एच. बुकस्टॉल, ४२१ वल्लभभाई पटेल रोड, मुंबई ४. येथें प्रसिद्ध केलें.

२६६३३
बा. ग्रं.
६६२
२९।३।६०

# मुमु

मॉस्को शहरांत, साधारण गांवाबाहेरच असलेल्या एका जुनाट बंगलेवजा घरांत एक विधवा स्त्री राहत होती. त्या बैठ्या, दुमजली, शुभ्र संगमरवराप्रमाणें भासणाऱ्या दगडी खांबांच्या घरांत कामाला असलेल्या दासदासींची नक्की संख्या त्यांच्या मालकिणीलाहि सांगतां आली नसती. ती धनीण होती एकटीच, कारण तिचे सर्व मुलगे पीटर्सबर्गला झार बादशहाच्या नोकरींत होते व तिच्या मुली सासरीं सुखानें नांदत होत्या. ती आपल्या घरांतून क्वचित्‌च कुठें बाहेर जाई; सारा दिवस आपले वृद्धापकाळचे कंटाळवाणे दिवस घरांतच बसून काढी. तिचा वेळ जातां जात नसे. म्हणून ती सदा दुःखी असायची. त्यांतल्या त्यांत तिला संध्याकाळ म्हणजे तर रात्रींपेक्षांहि भयाण भासत असे.

तिच्या सर्व नोकरचाकरांच्या गोतावळ्यांत सर्वांत विलक्षण प्राणी कोणी असेल, तर तो म्हणजे सारें आवार स्वच्छ करण्याच्या कामावर असलेला गेरासिम. तो चांगला सहा फूट उंच होता व दिसायचाहि एखाद्या राक्षसासारखा धिप्पाड, अन् विशेष म्हणजे तो जन्मतःच मुका न् बहिरा होता.

गेरासिमनें आपल्या आयुष्याचा बराचसा काळ खेड्यांत काढला होता. त्याच्या मालकिणीनें त्याला तिथूनच आपल्या घरीं आणलें होतें. खेड्यांत तो एकटाच, भाऊबंदांपासून निराळा, एका लहानशा झोंपडींत

राहायचा. त्याचा कधींच कुणाला उपसर्ग पोंचत नसे. खेड्यांतील सर्वांत चांगला शेतकरी म्हणून त्याची प्रसिद्धी होती. एखाद्या राक्षसाप्रमाणें असलेल्या आपल्या प्रचंड शक्तीच्या जोरावर तो एकटा चार चार माणसांचीं कामें करून टाकी. शेत नांगरीत असतांना नांगराच्या मुठी आपल्या दोन्ही हातांच्या मुठींत तो आवळून धरीत असे, तेव्हां पाहणाराला असें वाटायचें कीं तो घोड्याची मदत न घेतांच जमीन नांगरीत आहे. किंवा कांपणीच्या हंगामांत त्याचा विळा इतका सपासप आणि जोरांत चालत असे कीं एखाद्या गर्द झाडींतून तो कोंवळीं झाडेंच मुळासकट उपटून काढीत आहे, असें वाटे. मळणीच्या वेळीं त्याची भली मोठी मोगरी खळ्यांत त्वरेनें आणि एका तालावर चालत असे, तेव्हां त्याच्या मजबूत खांद्यांच्या पिळदार स्नायूंचीहि तालबद्ध हालचाल होई. तो इतक्या शांत वातावरणांत काम करीत असे कीं त्यामुळें त्याच्या अविश्रांत श्रमाला एक प्रकारचें गंभीर महत्त्व प्राप्त होत असे.

एकंदरींत तगडा गेरासिम फारच चांगला होता. बिचाऱ्याला तें मुकेपणाचें व्यंग नसतें तर कुणाहि मुलीनें आनंदानें त्याला नवरा म्हणून पसंत केलें असतें...

अशा प्रकारें गेरासिम आपल्या खेड्यांत सुखानें कालक्रमण करीत असतांनाच त्याची मॉस्कोला रवानगी झाली. तेथें त्याला लाँग बूट, उन्हाळी कोट व थंडीसाठीं कातड्याचा ओव्हर कोट देण्यांत आला आणि एक खराटा व कुदळ हातीं देऊन यार्डमनचें काम त्याच्यावर सोपविण्यांत आलें.

उभा जन्म खेड्यांत राहून शेतांतल्या कामांत आनंद मानणाऱ्या गेरासिमला प्रथम हें नवें काम फारच कंटाळवाणें वाटलें. त्याला शेतांतील कामाची व खेड्यांतील जीवनाची संवय झाली होती. बहिरे-मुकेपणामुळें एकाकी जीवन जगण्यापायीं एखाद्या सुपीक शेतांत एखादा वृक्ष वाढावा, तसा तो एकटाच वाढला होता. शहरांत आल्यावर प्रथम हें काय घडलें,

हेंच न कळल्यामुळें तो दिङ्मूढ होऊन मनांतल्या मनांत दुःखी झाला. खेड्यांत वाढलेल्या एखाद्या जवान मस्त बैलाला तो चरत असलेल्या कुरणांतून काढून एकदम रेल्वेच्या वाघिणींत बसविलें म्हणजे इंजिनांतून निघणारे धुराचे लोट व ठिणग्या आपल्याला कुठें नेत आहेत, हें न समजून त्या बैलाची जी केविलवाणी स्थिति होईल तीच अवस्था गेरासिमची झाली होती.

खेड्यांत असतांना सारा दिवस शेतांत कामाचे डोंगर उकरणाऱ्या गेरासिमला त्याचें नवें काम म्हणजे हातचा मळ होता. आवार स्वच्छ करण्याचें काम पूर्ण करण्याला त्याला जेमतेम अर्धा तास लागे. बाकीचा वेळ तो आवारांत उभा राहून येणाऱ्या जाणाऱ्यांकडे पाहत राही. जणुं काय त्यांच्या चेहेऱ्यांवरील भाव पाहून तरी आपल्या विचित्र परिस्थितीचा उलगडा होईल अशीच त्याची अपेक्षा असावी, असें त्यावेळीं त्याच्या डोळ्यांवरून वाटे. किंवा असें पाहत राहण्याचा कंटाळा आला म्हणजे तो झाडू फेकून देऊन एखाद्या कोपऱ्यांत तोंड खुपसून तासन् तास सांपळ्यांत अडकलेल्या जनावराप्रमाणें पडून राही !

पण कुठल्याहि परिस्थितीशीं जुळवून घेणें हा मनुष्यस्वभाव आहे व त्याच स्वभावधर्माला अनुसरून गेरासिम हळूहळू त्या शहरी जीवनांत रुळून गेला. त्याला कामहि फार नव्हतेंच. आवार स्वच्छ ठेवायचं, दोन वेळा पाण्याचं एक पिंप भरून आणायचं, सर्पण आणून ते फोडायचं, आवारांत तिऱ्हाइतांना शिरूं द्यायचं नाहीं व रात्रीं पहारा करायचा—बस, एवढंच ! अन् तो हें सारं काम तत्परतेनें पार पाडी. आवारांत कचरा म्हणून कधीं तो दिसूं द्यायचा नाहीं. एक मरतुकडं घोडं जुंपलेल्या पाण्याच्या गाडीचीं चाकं कधीं चिखलांत वा बर्फांत रुतलीं तर त्यानें नुसत्या एका खांद्यानं जरा धक्का दिला कीं ती गाडी नि घोडा वर येऊन पुनः सरळ चालूं लागत. तो लाकूड फोडण्याचं काम करी तेव्हां ती कुऱ्हाड जणुं काय कांचेवरच

चालवीत आहों अशा लीलेनें तो तिचे घांव घाली व खणाण आवाज करीत लाकडाचे तुकडे चौफेर उधळले जात. आणि आवारांत कुणी तिऱ्हाईत शिरण्याचा तर तो आल्यापासून प्रश्नच उरला नव्हता. सुरवातीलाच एका रात्रीं दोन चोर आंत शिरले तेव्हां त्यानें त्यांना धरून त्यांचीं डोकीं एकमेकांवर इतक्या जोरानें आपटलीं कीं त्यांना पोलिस चौकीवर पोंचविण्याची सुद्धां गरज पडली नाहीं व हा प्रकार कळतांच आसपासच्या भागांत त्याचा असा दरारा बसला कीं चोर-दरोडेखोर फिरकणें तर राहोच, पण दिवसा कांहीं कामानिमित्त येणारे लोक सुद्धां त्याला ऐकूं येत नाहीं हें विसरून प्रथम जोरानें ओरडून मगच आवारांत शिरण्याचा धीर करीत !

•

त्या वाड्यांतल्या इतर नोकरचाकरांशीं गेरासिमचे संबंध चांगले होते. पण त्यांतसुद्धां मैत्रीपेक्षां भीतीचाच भाग अधिक होता. सर्वजण त्याच्याशीं खुणांनीं बोलत व तोहि सर्व कामें बिनबोभाट व बिनतक्रार पार पाडी. पण आपल्या हक्कांबद्दल मात्र तो सदा जागरूक असायचा. जेवणाच्या मेजावर त्याची जागा घेण्याची कोणाची हिंमत नसे. असा त्याचा वचक होता.

गेरासिम गंभीर प्रकृतीचा माणूस होता व त्याची शिस्तहि फार कडक होती. प्रत्येक गोष्ट जिथल्या तिथें व व्यवस्थित असलीच पाहिजे असा त्याचा कटाक्ष असे. त्याच्यासमोर कोणाची गैर वागण्याची हिंमत नसे. फार काय, तिथले कोंबडे सुद्धां त्याला वचकून असत. आपल्याला भांडतांना त्यानें पाहिलें तर तो आपल्या तंगड्या धरील अन् फिरवून वेगवेगळ्या दिशांना फेकून देईल या भीतीनें ते त्याच्यासमोर गप्प राहात. गेरासिमच्या धनिणीच्या आवारांत हंसहि भरपूर होते व हंस हा प्राणी जात्याच सूज्ञ, गंभीर प्रकृतीचा असल्यामुळें गेरासिमला त्यांच्याविषयीं आपुलकी वाटे व तो त्यांच्याकडे खास लक्ष पुरवून त्यांना खाऊंपिऊं घाली. त्याचें स्वतःचें सुद्धां कांहीं बाबतींत एखाद्या रुबाबदार हंसाशीं साम्य होतें असें म्हटलें तर वावगें होणार नाहीं.

मुदपाकखान्याच्या वरची एक लहानशी खुराडेवजा खोली गेरासिमला देण्यांत आली होती. तिथें त्यानें आपल्या हौशीनुसार कांहीं चिजा जमवून ठेवल्या होत्या. तिथेंच चार भल्या मोठ्या ओंडक्यांवर ओक लाकडाच्या फळया घालून त्यानें आपला जंगी पलंग तयार केला होता. जणुं काय एखाद्या राक्षसाचाच भासेल अशा त्या अजस्र पलंगाला एक टनाचें ओझें सुद्धां भारी झालें नसतें. त्या पलंगाखालींच त्याची मजबूत लोखंडी पेटी होती. एका कोपऱ्यांत असेंच मजबूत मेज व त्याच्याजवळ एक तिपाई होती. ती सुद्धा अशी धडधाकट कीं गेरसिम स्वतःच कधीं लहर आली म्हणजे ती वर उचलून खालीं आपटी व ती तुटली नाहीं हें पाहून दांत विचकी ! त्या खोलीच्या दारालाहि तसेंच भलें मोठें कुलूप लावून किल्ली खिशांत ठेवल्या-शिवाय गेरासिम कधीं बाहेर पडत नसे, कारण आपल्या खोलींत कोणी आलें गेलेलें त्याला खपत नसे.

अशा शहरी जीवनांत गेरासिमचें एक वर्ष गेल्यावर त्याच्या जीवनांत खळबळ माजविणारी एक घटना घडली.

गेरासिमची धनीण परंपरा व रूढी यांची फार भोक्ती होती. त्यामुळें संसाराचा व्याप संपला तरी तिच्या नोकराचाकरांचा पसारा पूर्वीसारखाच कायम होता. कपडे धुणें व शिवणकाम यांसाठीं कांहीं दासी, इतर कामाच्या दासी, शिवाय सुतार, शिंपी वगैरे माणसें तर होतींच, पण पूर्वीचा घोड्यांचें खोगीर बनविणाराहि अजून कामावर होता. तोच आतां गुरांचा व त्याचबरोबर नोकरचाकरांचाहि डॉक्टर म्हणून काम पाहत होता. शिवाय मालकिणीसाठीं एक स्वतंत्र डॉक्टर होता तो निराळाच. या सर्व नोकरांच्या गोतावळ्यांत एक चांभारहि होता. त्याचें नांव कापितोन क्लिमोव. तो कमालीचा दारुड्या होता, पण त्याच्या मतें या दारुबाजीचें एक कारण होतें. तो थोडासा शिकलेला होता व आपल्यासारख्या सुसंस्कृत माणसाला त्या ओसाड जागीं डांबण्यांत आल्यामुळें आपल्या अंगच्या गुणांचें चीज होत नाहीं व विकासहि

होत नाहीं, अशी त्याची तक्रार होती व हें दुःख विसरण्यासाठींच आपण दारू पितो असें तो छाती पिटून सांगत असे.

एक दिवस हा क्लिमोव दारू पिऊन गटारात लोळत असतांना त्याला उचलून आणावें लागलें. तेव्हां दुसऱ्या दिवशीं धनिणीनें घरच्या मुख्य बटलरला बोलावणें पाठवलें. या मुकादमाचें नांव होतें गाव्रिलो. त्याचे डोळे पिवळसर होते व नाक बदकाच्या चोचीसारखें. परंतु एकंदरीनें त्याचा चेहरा त्याच्या दर्जाला साजेसा रुबाबदार असाच होता. तो आल्यावर त्याची धनीण क्लिमोवचा विषय काढून म्हणाली,

" आपण त्याचं लग्नच लावून दिलं तर ? मला वाटतं मग तो नीट वागेल. तुझं काय म्हणणं आहे, गाव्रिलो ? "

" होय, आपण त्याचं लग्न लावून द्याल तर तो नीट मार्गाला लागेल."

" पण त्याच्याशीं लग्न करायला कोणती पोरगी तयार होईल ? "

" आपण सांगाल ती, बाईसाहेब ! तसा तोहि कांहीं अगदींच वाईट नाहीं. निदान इतरांपेक्षां फार जास्त वाईट तर खास नाहीं."

" त्याला तात्याना आवडते, हें मी पाहिलं आहे. "

गाव्रिलोला कांहीं म्हणायचं होतं, पण त्यानें ते शब्द आंतल्या आतच गिळून टाकले.

" ठीक तर मग. " धनीण स्वतःवरच खूष होऊन तपकीरीची चिमूट घेत म्हणाली. " आतां पुढची व्यवस्था कर. "

" जी बाईसाहेब, " म्हणून गाव्रिलो तिथून निघाला व एका बाजूला असलेल्या आणि लोखंडी कपाटें खच्चून भरलेल्या स्वतःच्या खोलीत गेला. नंतर बायकोला बाहेर पाठवून खिडकीशीं बसून तो विचार करूं लागला. धनिणीकडून मिळालेल्या अनपेक्षित आज्ञेमुळें तो मोठ्या पेंचांत सांपडला होता.

गावूरिलोला पेंचांत पडण्याचें कारणहि तसेंच होतें.

क्लिमोवचें जिव्याशीं लग्न लावून देण्याचें त्याच्या धनिणीनें ठरवलें होतें ती तात्याना ही त्याच घरांत धुण्याच्या कामाला होती. तिचें वय अठ्ठावीस वर्षांचें होतें. तिची अंगकाठी सडपातळ, केस रेशमी व डाव्या गालावर तीळ होता. डाव्या गालावर तीळ असणें हें रशियांत अभागी-पणाचें लक्षण मानतात. तात्यानाहि दुर्दैवीच होती. अगदीं लहान वया-पासूनच तिला काबाडकष्ट करावे लागत होते व प्रेमाच्या ओलाव्याचा अभाव होता. ती कामांत फारच हुशार होती, इतकी कीं घरांतले फक्त उंची कपडेच तिला धुवावे लागत. पण इतकंहि असून तिला पगार नांवालाच होता. तिच्या नात्यांतला असा फक्त एक तिचा काका होता. पण तोहि बटलरचें काम करून म्हातारा झाल्यामुळें खेड्यांतच खितपत होता. दुसरे दूरचे काकेमामे होते. तेहि शेतांत राबणारे. ती विशींत असतांना फारच सुंदर दिसे. पण आतां तिचं सौंदर्य पार मावळलं होतं. ती स्वभावानं अगदींच गरीब, नव्हे भित्रीच होती. ती कुणाकडे लक्ष द्यायची नाहीं व सर्वांना भिऊन वागायची. आपलं काम कसं उरकेल याच विवंचनेंत तिचा दिवस जाई. कधीं चांगले कपडे घालणं कीं कधीं कुणाशीं बोलणं तिला माहीत नव्हतं. तिला मालकिणीसमोर जाण्याचं कधीं काम पडत नसलं तरी सुद्धा नुसतं तिचं नांव निघालं तरी तिचा जीव घाबरा होई.

गेरासिम त्या घरांत आला तेव्हां तात्यांना त्याच्या अजस्र देहयष्टीकडे पाहून भेदरलीच. इतकी कीं त्याच्या वाऱ्याला सुद्धां ती उभी राहीना. तो नुसता दुरून दिसला कीं ती लांब पळायची. आरंभीं गेरासिमचंहि तिच्याकडे लक्ष गेलं नाहीं, पण नंतर तो तिच्याकडे पाहून हंसूं लागला, स्नेहपूर्ण कटाक्ष टाकूं लागला, व मग तर त्याचे डोळे नेहमींच तिला शोधूं लागले. कदाचित् तिच्या भित्रेपणामुळेंच तो तिच्याकडे आकर्षित झाला असेल, कुणी सांगावं ? आणि मग एक दिवस ती धनिणीचं कडकडीत इस्त्रीचं पोलकं घेऊन

आवारांतून जात असतां आपल्या दंडावर मजबूत पकड बसल्यासारखं तिला वाटलं. तिनें मागें वळून पाहतांच एक किंकाळी फोडली–गेरासिमच तिच्यामागें उभा होता. बावळटपणें हंसून व कांहींतरी प्रेम व्यक्त करणारे आवाज काढीत त्यानें सोनेरी पिसं व शेपटी असलेला एक मस्त कोंबडा तिच्या पुढें केला व ती नाहीं म्हणण्यापूर्वीच तो तिच्या हातीं ठेवून त्यानें तिचा हात सोडला व मान हालवीत व पुनः कांहीं आवाज काढीत तो निघून गेला. या प्रसंगानंतर त्यानें सतत तिचा पिच्छा पुरवला. ती जिथें जाई तिथें तो हजर असायचा. हंसत हंसत तोंडानें कसला तरी आवाज करीत, हात हालवीत तो तिच्याजवळ जायचा आणि खिशांतून रिबिन काढून तिला ती भेट द्यायचा. बिचारी तात्याना घाबरून गेली. काय करावं हेंच तिला कळेना. थोड्याच दिवसांत सगळ्या घरांत तिची चेष्टा सुरू झाली. घालूनपाडून बोलणीं व टोमणे यांचा मारा सुरू झाला. पण हे सर्व वाग्बाण तात्यानावरच येत. गेरासिमची थट्टा करण्याची कुणाची हिंमत नव्हती. फार काय, तो समोर असला म्हणजे तात्यानालाहि कोणी बोलूं शकत नसे. तिला आवडो वा नावडो, तो तिचा रक्षणकर्ता बनला होता हें खरें. सगळ्या बहिऱ्या–मुक्यांप्रमाणेंच गेरासिमची बुद्धि फार तीक्ष्ण होती व लोक आपल्याकडे अगर तात्यानाकडे पाहून कां हंसतात हें त्यानें चटकन् ओळखलें होतें.

एकदां जेवणाचे वेळीं तात्यानाची वरिष्ठ मेट्रन तिला शिवीगाळ करीत होती व तात्याना इतकी जेरीस आली होती कीं दुःखानें तिला रडूं कोसळलं. इतक्यांत गेरासिम उभा राहिला आणि आपल्या जबरदस्त मुठीनें त्या मेट्रनच्या डोक्यावर तडाखा हाणून अशा जळजळीत दृष्टीनें तिच्याकडे पाहूं लागला कीं ती मटकन् खालींच बसली. इतर सारे गप्प राहिले व गेरासिमहि पुनः थंडपणें जेवूं लागला. सगळे तोंडांतल्या तोंडांत पुटपुटले, "काय भयंकर प्राणी आहे हा मुका!" ती मेट्रनहि तेथून निमूटपणें नोकरांच्या खोलींत निघून गेली.

नंतर एकदां कापितोन फार रंगांत येऊन तात्यानाशीं बोलत होता. गेरासिमनें तें पाहून त्याला बाहेर बोलावून गाडीखान्यांत नेलें व तेथें एक दांडा उचलून अर्थपूर्ण रीतीनें कापितोनवर उगारला व त्याला चांगली समज दिली.

अशा एकदोन प्रसंगांनंतर कोणी तात्यानाशीं बोलत उभे राहाण्याचा धीर करणें शक्यच नव्हते.

गेरासिमचा तडाखा बसल्यानंतर ती मेट्रन नोकरांच्या खोलींत जाऊन बेशुद्ध पडली आणि नंतर तिनें आपल्या मालकिणीकडे गेरासिमच्या विरुद्ध तक्रार केली. पण त्याचा परिणाम मात्र उलटाच झाला. ती मालकीण गेरासिमवर गरम तर झालीच नाहीं, उलट तिला त्या प्रकाराची मौज वाटून ती हंसतच सुटली व मॅट्रनकडून पुनः पुनः ती हकीकत ऐकून घेऊन तिनें गेरासिमला एक चांदीचा रुबल इनाम म्हणून पाठवून दिला !

गेरासिमची ताकद व इमानीपणा यांवर ती धनीण आधींच खूष होती व तोहि तिला भीत असला तरी तिची आपल्यावर मर्जी आहे हें जाणून होता. म्हणून तात्यानाशीं लग्न करण्यासाठीं धनिणीकडे परवानगी मागण्याचें त्यानें नक्की केलें. मुख्य बटलरनें त्याला एक कोट देण्याचें कबूल केलें होतें. तो मिळतांच धनिणीपुढें जायचें गेरासिमनें ठरवलें होतें.

पण गेरासिमचा हा इरादा कृतींत उतरण्यापूर्वीच वर सांगितल्याप्रमाणें मालकिणीनें तात्यानाचें लग्न कापितोनशीं लावून देण्याचा बेत केला.

मुख्य बटलर गाव्रिलो याला धनिणीच्या आज्ञेनें पेंच पडला होता तो याचमुळें. आपल्या खिडकींत बसून तो विचार करीत होता, “ माझ्या मालकिणीची गेरासिमवर मर्जी आहे ( गाव्रिलोला हें चांगलें माहीत होते व म्हणून तो स्वतःवरच खूष होता ). कांहीं झालं तरी तो मुका प्राणी आहे. त्याचं तात्यानावर प्रेम आहे, अशी मालकिणीकडे तक्रार करायची तर सोय नाहीं. शिवाय तात्यानाला हा मुका नवरा काय कामाचा ? पण

तिचं लग्न कापितोनशीं होणार, हें कळतांच तो सारं घर डोक्यावर घेईल, अगदी नक्कीच. त्याच्याशीं वाद घालणंहि शक्य नाहीं. तो कशालाच दाद देणार नाहीं...."

गाव्रिलो असा विचारांत गढून गेला असतांनाच कापितोन आंत आला. त्याला अर्थात कशाची कांहींच कल्पना नव्हती. पाठीमागें हात बांधून, मोठ्या मजेनें भिंतीशीं रेलून आणि डावा पाय उजव्या पायावर टाकून तो गाव्रिलोसमोर उभा राहिला. जणुं त्याला म्हणायचं होतं, हा मी आलों आहे, काय काम आहे तुझं ?

गाव्रिलोनें त्याला एकदां न्याहाळून पाहिलें व मग बोटांनीं खिडकीच्या फरशीवर ताल धरला. कापितोननें आपले जड पडलेले डोळे बारीक केले. पण आपली नजर मात्र खाली वळविली नाहीं. आपल्या पिंगट केसांवरून हात फिरवीत तो किंचित हंसला.

थोड्या वेळानें गाव्रिलो उद्गारला, " वा ! छान ! कमालच आहे तुझी ! "

कापितोन खांदे उडवीत स्वतःशींच पुटपुटला, " अन् तूं काय मोठा चांगला दिसतोस ? "

" जरा स्वतःकडे पहा. " गाव्रिलो दटावणीच्या स्वरांत म्हणाला. " बघ, कसा अवतार आहे तुझा ? "

कापितोननें स्वतःच्या फाटक्या कोटाकडे, ठिगळ लावलेल्या विजारीकडे व भोकं पडलेल्या बुटांकडे नजर टाकून जरा घुश्शांतच विचारलें, " बरं मग. याचं काय ? "

" वा, आणखी वर मलाच विचारतोस ? या अवतारांत तूं भूत दिसतोस नुसता ! "

कापितोन उघडपणें कांहींच बोलला नाहीं, पण तो स्वतःशीच म्हणाला, " ठीक आहे. तुझ्या हातीं सत्ता आहे, बोलून घे हवं तेवढं ! "

गावूरिलो पुनः गरजला, " तूं पुनः पिऊन झिंगला होतास. होय ना ? "

" माझ्या अशक्तपणामुळें मला मद्यसेवन करणें आवश्यक झालं, " कापितोन उत्तरला.

" तुझा अशक्तपणा काय ? छान ! तुला आजवर चांगला धडा शिकवला गेला नाहीं म्हणून तुझ्या या गमजा ! आणि म्हणे मी पीटर्सबर्गमध्यें काम शिकलों. हेंच शिकलास वाटतं तिथं ? फुकट भाकरी खातोस लेका ! "

" कामाबद्दल विचारशील, गाव्रिलो आंद्रेइच, तर माझा फक्त देवच साक्षी आहे, आणि कालच्या पिण्याबद्दल म्हणशील तर यावेळीं खरोखरीच माझा दोष नव्हता. एका दोस्तानें मला तिकडे नेलें अन् बेटा मला एकटा सोडून अदृश्य झाला... "

" आणि तूं गटारांत लोळत पडलास ! गाढव आहेस झालं ! तुझ्यांत सुधारणा होण्याची आशाच नको ! बरं, तें जाऊं दे ! आज मी तुला बोलावलं तें दुसऱ्याच कामासाठीं. हें पहा, आपल्या मालकिणीनं तुझं लग्न करून द्यायचं ठरवलं आहे, समजलास ! लग्न झालं म्हणजे तरी तूं वळणावर येशील असं तिला वाटतं. काय ? "

" ऐकतों आहे मी. "

" हं. माझ्या मतं तुला कोणीतरी धाकांत ठेवायला हवं. पण हा तिच्या मर्जीचा प्रश्न आहे. काय ? तुला पसंत आहे ना ? "

कापितोन दांत विचकून उत्तरला, " लग्न हें माणसाला करायलाच हवं. तेव्हां माझी मोठ्या खुषीनें संमति आहे. "

"या माणसावर शिक्षणाचे संस्कार आहेत खरे," हें स्वतःशींच मान्य करून गाव्रिलो पुढें म्हणाला, "पण पंचाईत अशी कीं मालकिणीनें तुझ्यासाठीं शोधून काढलेली मुलगी मात्र योग्य नाहीं—"

"पण ती कोण, हें मी विचारूं शकतों का?"

"तात्याना."

"तात्याना!" असें म्हणून कापितोन दचकून पुढें सरकला.

"कां? बिचकलास? ती पसंत नाहीं तुला?"

"छे छे! गाव्रिलो आंद्रेइच, मला ती आवडते खरी—ती तशी फार चांगली मुलगी आहे, कष्टाळू आहे, आज्ञाधारक आहे...पण—पण तो ब्रह्मसमंध तिच्या मागं आहे ना!"

"हो. तें सगळं मला माहीत आहे रे." गाव्रिलो जरा चिडून म्हणाला. "पण—"

तो 'पण' वरच थांबला तेव्हां कापितोनच पुनः बोलूं लागला, "पण तो राक्षस मला ठार करील, गाव्रिलो आंद्रेइच! माशी चिरडून टाकावी तितक्या लीलेनं तो माझा प्राण घेईल. त्याच्या हातांत किती ताकद आहे हें तूंहि जाणतोसच. कसलेल्या मुष्टियोद्धयासारखा हात आहे त्याचा. तो बहिरा दणकन् सपाटा हाणतो अन् त्याला मात्र तो ऐकूं येत नाहीं! जणुं काय तो झोपेंतच हात फिरवीत असतो! त्याचा पिच्छा सुटणं फार कठीण आहे बघ. तो बहिराच नव्हे तर मूर्खहि आहे. तो हिंस्र पशु आहे... लाकडाचा ठोकळा आहे तो नुसता. माणूस कसला तो, दगडाची मूर्ति आहे मूर्ति! त्याच्याकडून किती म्हणून छळ सोसूं मी? मला तें नवीन आहे असं नव्हे, पण तरी सुद्धां प्रत्येक गोष्टीला सीमा असतेच कीं..."

"बरं बरं, किती बोलशील?" गाव्रिलोने चिडून त्याला अडवण्याचा यत्न केला.

" देवा ! तूंच साक्षी आहेस ! " कापितोनचें बोलणें पुनः सुरू झालें. " याचा शेवट तरी कधीं होणार ? पण माझं नशीबच फुटकं त्याला कोण काय करणार ? लहानपणीं माझ्या जर्मन धन्यानं माझ्या देशबांधवांकडूनच मला झोडपून काढलं, अन् आज मोठेपणीं ही दशा..."

" अगदींच दुबळा रे तूं ! असं कसं चालेल या जगांत ? "

" मी करूं तरी काय, गाव्रिलो आंद्रेइच ? माझ्या धन्यानं मला झोडपलं तरी चालेल, पण चारचौघांत तो मला नीट वागवील तोंवर मी तक्रार करणार नाहीं. पण या अशा भयंकर प्राण्याकडून माझा छळ..."

" बरं, बरं. समजलं ! जा. नीघ आतां इथून ! " गाव्रिलो चिडून ओरडला.

क्लिमोव पाठ फिरवून चालूं लागला तसें गाव्रिलोनें एकदम त्याला विचारलें,

" बरं. पण त्याचा अडथळा नसला तर तुझी तयारी आहे ना ? "

" मग माझी मुळींच ना नाहीं, " कापितोननें ऐटींत उत्तर दिलें व तो निघून गेला.

" आतां राहिली तात्याना ! " गाव्रिलो आपल्या खोलींत येरझारा घालीत म्हणाला.

थोड्या वेळानें मुळींच पाय न वाजवतां तात्याना दारांत येऊन उभी राहिली व तिनें मृदु स्वरांत विचारलें, " मला बोलावलं होतं, गाव्रिलो आंद्रेइच ? "

गाव्रिलो तिच्याकडे टक लावून पाहत म्हणाला,

" तात्याना, तुला लग्न करायचं आहे ना ? आपल्या मालकिणीनें तुझ्यासाठीं एक नवरा शोधून काढलाय. "

" होय ? कुणाशीं लग्न करायचं आहे मला ? "

" कापितोन. तो मोची. "

" हूं. "

" तो जरा बेताल आहे खरा, पण तूं त्याला लगाम घालूं शकशील असा मालकिणीला भरंवसा आहे. "

" हं. "

" एकच अडचण आहे, ती म्हणजे त्या मुक्याची. त्याला तूं हवी आहेस ना ? पण त्या अस्वलाचं प्रेम तूं कसं मिळवलंस ? तो जीवच घेईल तुझा. "

" होय, तो नक्कीच जीव घेईल माझा."

" खरंच ? बरं. त्याचं पाहून घेऊं आपण. काय, जीव घेईल म्हणालीस ? पण त्याला तुझा जीव घेण्याचा काय हक्क आहे ? तूंच सांग बरं ! "

" त्याला हक्क आहे कीं नाहीं हें मी कसं सांगूं ? "

" तूं तरी विचित्रच पोरगी दिसतेस, तात्याना ! तूं त्याला कांहीं वचन बिचन तर दिलं नाहींस ना ? "

" काय म्हणालांत तुम्ही ? "

गाव्रिलो स्वतःशींच म्हणाला, " भोळी बिचारी ! " नंतर तो तिला म्हणाला, " बरं तर, जा तूं. आपण पुन्हां बोलूं. तूं सरळ मुलगी आहेस हें मी जाणतों. जा तूं."

तात्याना जशी आली तशीच निघून गेल्यावर गाव्रिलो स्वतःशींच विचार करूं लागला, " बहुधा मालकिणीच्या डोक्यातलं हें खूळ उद्यापर्यंत निघून जाऊन तिला त्याचा विसरहि पडेल. मग मी तरी कशाला उगीच डोक्याला त्रास देऊं ? अन् तशीच वेळ आली तर त्या दांडगटाचा बंदोबस्त

करणं कांहीं कठीण नाहीं. फार तर पोलिसाची मदत घ्यावी लागेल, दुसरं काय ? "

" उस्तिन्या फ्योदोरोवना, " आपल्या बायकोला त्यानें मोठ्यानें हांक मारली. " जरा सामोवार गरम करून चहा दे बरं ! "

तो सबंध दिवस तात्यानानें आपल्या कामाच्या खोलींतच घालवला. प्रथम थोडा वेळ तिनें डोळ्यांतून पाणी काढलं, पण तें अगदीं थोडा वेळच. पुन्हां ती कामाला लागली.

कापितोन त्या दिवशी रात्रीं उशीरापर्यंत गुत्त्यातच होता. पीटर्सबर्गमध्यें असतांना आपण एका बड्या गृहस्थाची चाकरी केली, तो धनी कसा सज्जन होता, त्याचा बाई नि बाटलीचा नाद सोडला तर एरवीं तो किती चांगला होता, हें तो आपल्या एका उदास चेहऱ्याच्या मित्राला पुनः पुनः सांगत होता... अन् तो मित्रहि धुंद होऊन सारखी मान डोलवीत होता.शेवटीं कापितोननें त्या मित्राला सांगून टाकलें कीं कांहीं खास कारणामुळें दुसऱ्या दिवशीं आपण कुठें तरी निघून जाणार आहोंत. यावर त्या मित्रानें फक्त ' आतां फार रात्र झाली आहे. ' एवढेंच उद्गार काढले व मग ते एकमेकांशीं कांहीं न बोलतां त्या अंधारांत बाहेर पडले.

तात्यानाचें कापितोनशीं लग्न लावून देण्याची कल्पना ही आपल्या मालकिणीची केवळ लहर आहे व ती एक दोन दिवसांत नाहींशीं होईल, हा गाव्रिलोचा अंदाज मात्र सपशेल चुकला. मालकिणीला निद्रानाशाचा विकार असल्यामुळें तिचें मनोरंजन करण्यासाठीं ठेवलेल्या मैत्रिणीशीं त्या रात्रीं ती सारखं त्याच विषयावर बोलत राहिली. आणि सकाळीं चहापानानंतर गाव्रिलो तिच्यासमोर जातांच तिनें पहिला प्रश्न केला, तो हाच कीं लग्नाची तयारी कोठवर आली. अर्थात तयारी जारीनें सुरू आहे असें सांगणें त्याला भागच होतें व त्यानें तसेंच सांगितलें. आणि कापितोन त्याच दिवशीं तिचे आभार मानण्याला येईल असेंहि गाव्रिलोनें सांगून टाकलें. मालकीणबाईला त्या

दिवशीं जरा बरें वाटत नव्हतें, म्हणून बराच वेळ कांहीं न करतां ती नुसती बसून राहिली. गाव्रिलो घरीं परत गेला व त्यानें सर्व नोकरांना एकत्र बोलावून त्या प्रश्नाची चर्चा सुरू केली. तात्यानानें कांहीं हरकत घेतली नाहीं, पण कापितोन मात्र म्हणाला, "मला काय दोन तीन डोकीं आहेत कीं मी एक गमावण्याला तयार होऊं ?"

गेरासिम त्या चर्चेंत नव्हता. पण त्याची उदास नजर चहूंकडे भिरभिरत होती. आपल्याविरुद्ध कांहीं कारस्थान शिजत आहे, याचा जणुं वास लागूनच कीं काय, तो नोकरांच्या खोलीबाहेर व्हरांड्यांत फेऱ्या मारीत होता.

नोकरवर्गांत एक म्हातारा नोकर होता. त्याला सगळेजण ख्वोस्तकाका म्हणत व त्याचा सल्लाहि नेहमीं घेतला जाई. तो नेहमीं 'होय'. 'अर्थात्च', अशा शब्दांखेरीज कांहीं सल्ला देत नसे, पण तरी सगळे त्याला मान देत. आजच्या सभेंत ख्वोस्तकाका हजर होता. कापितोनच्या सुरक्षिततेसाठीं त्याला अगोदर न्हाणीघरांत बंद करण्यांत आलें व मग त्यांचें खलबत सुरू झालें.

गेरासिमला धाक दाखवून किंवा मारहाण करून कार्यभाग उरकून घेतां आला असता. पण त्यामुळें मालकिणीला थोडा त्रास झाला असतां तर तिनें आकाशपाताळ एक केलें असतें हें सर्वजण जाणून होते. मग दुसरा उपाय कोणता ? शेवटीं एक मार्ग निघाला. गेरासिमला दारू पिऊन झिंगणाऱ्यांबद्दल मनस्वी तिटकारा होता हें सर्वांना माहीत होतें. गेरासिम फाटकापाशीं बसला असतांना कुणी दारूच्या धुंदीत डोळ्यावर टोपी ओढून झोकांड्या खात त्याच्या समोरून गेले, तर तो रागारागानें आपलें तोंड फिरवीत असे. तेव्हां तात्यानानें पिऊन तर्र झाल्याचें सोंग करावें व झोकांड्या खात गेरासिम समोरून जावें, म्हणजे तो तिचा नाद सोडील, अशी युक्ति पुढें मांडण्यांत आली. प्रथम तात्याना या गोष्टीला कबूल होईना. पण शेवटीं सर्वांनी तिचें मन वळविलें. गेरासिमच्या तडाख्यांतून निसटण्याचा दुसरा मार्ग नाहीं, हें तिलाहि समजून चुकलें आणि ती झिंगण्याचें नाटक

करण्यास तयार झाली. कापितोनला न्हाणीघरांतून बाहेर काढण्यांत आलें. कारण या सर्व गोष्टींचा त्याच्याशींच संबंध होता. तेव्हां त्याला बंद ठेवून कसें चाललें असतें ?

तात्याना झोंकांड्या खात बाहेर आली, तेव्हां गेरासिम फाटकाजवळ एका स्टूलावर बसला होता व आपल्या कुदळीनें जमिनीवर उगाच रेघोट्या काढीत होता. सर्व नोकर, कुणी कोपऱ्यांत उभे राहून तर कुणी खिडक्यांच्या पडद्यांआड दडून त्याच्याकडे पाहत होते. तात्याना दिसतांच गेरासिमने नेहमीं प्रमाणेंच विचित्र आवाज करीत मान हालविली. मग तो तिच्याकडे सारखा पाहूं लागला, हातांतली कुदळ त्याने खालीं टाकली, व ताडकन् उठून तो तिच्याकडे गेला आणि तिच्या तोंडासमोर जाऊन उभा राहिला...त्याला पाहून तात्यांना घाबरली व जास्तच झोकांड्या खात तिनें आपले डोळे मिटून घेतले...तिचा हात धरून गेरासिमनें तिला ओढीतच नोकरांच्या खोलींस नेलें व कापितोनच्या अंगावर ढकलून दिलें. ती बिचारी जवळ जवळ बेशुद्ध होण्याच्या बेतांतच आली होती...गेरासिम तिच्याकडे पाहत क्षणभर उभा राहिला व मग तेथें हवळ्यासारखे हावभाव करून एक भीषण हास्य करीत तो जों तीरासारखा तेथून बाहेर पडला तों थेट स्वतःच्या खोलींत !

तो सबंध दिवस न् सारी रात्र गेरासिमनें स्वतःला खोलींत कोंडून घेतलें होतें. घोडेस्वार आंतिप्कानें दाराच्या फटींतून पाहून अशी बातमी आणली कीं गेरासिम आपल्या खाटेवर तळहातावर डोकें ठेवून शांत बसलेला होता व मधूम मधून यें त्रें करून गात होता. म्हणजेच गाडीवान किंवा कोळी जेव्हां आपल्या शोकपूर्ण गाण्याचे हेल काढतात, तेव्हां मागेपुढें झुलतात, डोळे बंद करतात आणि डोकें हालवितात, तसेंच गेरासिमहि करीत होता. तें दृश्य इतकें हृदयद्रावक होतें कीं आंतिप्काला फार वेळ तें पाहत राहण्याची सुद्धां हिंमत झाली नाहीं !

दुसऱ्या दिवशीं गेरासिम खोलींतून बाहेर पडला तेव्हां त्याच्यांत कांहीं विशेष बदल झाला आहे, असें दिसलें नाहीं. फक्त त्याचा चेहरा नेहमींपेक्षां अधिक खिन्न व मलूल दिसत होता, पण त्यानें तात्याना व कापितोनकडे मात्र ढुंकूनहि पाहिलें नाहीं.

अशा प्रकारें नोकरमंडळींची युक्ति सफल झाल्यावर कापितोन व तात्याना रूढीप्रमाणें एकेक हंसाचा नजराणा घेऊन मालकिणीच्या भेटीला जाऊन आले व एक आठवड्यानें त्यांचा विवाह समारंभ पार पडला. प्रत्यक्ष लग्नाच्या दिवशीं गेरासिमच्या नित्यक्रमांत व थंड वागणुकींत कांहीं बदल दिसला नाहीं. मात्र त्या दिवशीं तो नदीवर पाणी आणायला गेला तो तसाच परत आला. वाटेंत त्याच्या हातून कधीं नव्हे तो त्याच दिवशीं पिंप खालीं पडून फुटला! आणि त्या रात्रीं त्यानें घोड्याला असा कांहीं विलक्षण खरारा केला कीं तें बिचारें जनावर गेरासिमच्या पोलादी मनगटाच्या रगड्याखालीं सारखें या पायावरून त्या पायावर उडत होतें!

या सर्व घटना वसंतऋतूंतल्या. नंतर वर्षभराच्या आंतच कापितोन सुधारण्याऐवजीं दारूच्या पार आहारीं गेला व कुचकामाचा ठरून त्याची तात्यानासहित दूरच्या खेड्यांतील शेतात रवानगी झाली. कापितोनला रवाना करण्याची मालकिणीची आज्ञा झाली तेव्हां प्रथम त्यानें जणुं कांहीं आपल्याला त्याचें कांहींच नाहीं असा आव आणला. अगदीं धोबीघाटावरचं काम दिलं तरी तें मी नेहमींप्रमाणेंच नेकीनें करीन, अशी त्याची बडबड सुरू होती. पण जाण्याच्या दिवशीं त्याचें हें उसनें अवसान पार गळाठलें व आपल्याला अशिक्षित खेडवळांच्या संगतींत दिवस काढणें म्हणजे फारच जबर शिक्षा आहे, अशी त्याची कुरकूर सुरू झाली. दाराशीं प्रत्यक्ष गाडी उभी राहिली तेव्हां तर त्याचा धीर इतका खचला कीं डोक्यावर धड टोपी घालण्याचें सुद्धां त्याला भान नव्हतें. अखेर कुणी तरी त्याच्या डोक्यावर टोपी ठेवून त्याला गाडींत चढवलें.

गाडी अगदीं निघायच्या तयारींत असतां गेरासिम अचानक बाहेर आला व त्यानें वर्षभरापूर्वी तात्यानाला भेट म्हणून देण्यासाठीं घेऊन ठेव-लेला एक लाल हातरुमाल आपली आठवण म्हणून तिच्या हातीं दिला. आतांपर्यंत अनेक दुःखांनीं पोळलेल्या तात्यानाला या प्रकारानें एकदम रडूंच कोसळलं व तिनें आपण होऊन गेरासिमला खिश्चन धर्मातल्या रूढीनुसार गालाचे तीन मुके दिले.

गेरासिम शहराच्या वेशीपर्यंत त्यांना पोंचविण्याच्या इराद्यानें गाडीच्या मागें चालूं लागला, पण त्याला मध्येंच काय वाटलें कुणास ठाऊक, गाडी क्रिम्स्की फोर्डपाशीं असतांनाच तो अचानकपणें हात हालवीत तात्यानाचा निरोप घेऊन नदीच्या बाजूला वळून अल्पावधींतच दिसेनासा झाला.

ती तिसऱ्या प्रहरची वेळ होती. गेरासिम पाण्याकडे पाहत किनाऱ्या-वर येरझारा घालीत होता. अचानक त्याला दिसलं, किनाऱ्यालगतच्या गाळांत कांहीं तरी सळसळत होतं. त्यानें खालीं वाकून पाहिलं. तें एक कुत्र्याचं पिलूं होतं. पांढरं शुभ्र, अन् त्यावर काळे डाग! बिचाऱ्याची बाहेर पडण्याची धडपड सुरू होती. पण त्या इवल्याशा जिवाला तें साधित नव्हतं. जरा पाय वर निघाला कीं तें पुनः घसरून खालीं पडे. गेरासिमनें पटकन् तें पिलूं उचललं, आपल्या सदऱ्यांत लपवलं अन् तो तडक घराकडे निघाला. खोलींत पोंचतांच त्यानें त्या पिलाला आपल्या बिछान्यावर ठेवून ओव्हरकोटाचें पांघरूण घातलं व तो लगोलग बरेंचसें गवत अन् पेलाभर दूध घेऊन आला. अगदीं हलुवार हातांनीं त्यानें त्या पिलाला गवतावर निजवून त्याच्याजवळ दुधाचा पेला ठेवला. पण तें पिलूं होतें जेमतेम तीन आठवड्यांचें. त्याचे डोळे सुद्धां अजून उघडलेले नव्हते. एक डोळा लहान तर दुसरा मोठा दिसत होता. त्याला पेल्यांतून दूध पिणं जमेना. त्यानें डोळे किलकिले करून दुधाकडे नुसतें पाहिलं. गेरासिमनें दोन बोटांच्या चिमटींत त्याचें डोकें धरून पेल्यांत खुपसलें. तेव्हां तें पिलूं आधाशीपणें दूध पिण्याचा

प्रयत्न करूं लागलें. आरंभी त्याला तें जमेना, पण थोड्या वेळांतच त्यानें ती कला अवगत केली...

तें दृश्य पाहून गेरासिमला धन्यता वाटली व तो जोरजोरानें हंसूं लागला. सारी रात्र तो त्या चिमुकल्या जिवाला जवळ घेऊन कुरवाळीत होता, त्याचें अंग चोळून त्याला ऊब आणीत होता. अगदीं पहांटेच्या वेळीं तो त्या पिलाच्या बाजूला अत्यंत समाधानानें झोंपीं गेला.

एखादी आई आपल्या लेकराची काय काळजी घेईल इतक्या आस्थेनें गेरासिम त्या पिलाला वाढवूं लागला. तें पिलूं स्त्रीजातीय होतं व आरंभीं दिसायलाहि अगदीं मरतुकडं अन् ओंगळ होतं. पण गेरासिमनें त्याची जी रात्रंदिवस काळजी घेतली त्याचे सुपरिणाम दिसूं लागून सुमारें आठ महिन्यानंतर ती 'स्पॅनिश' जातीची सुंदर कुत्री मानली जाऊं लागली. तिचे लांब कान, झुपकेदार शेपूट, मोठे मोठे चित्ताकर्षक डोळे, यांचा गेरासिमला तर भारीच अभिमान! ती कुत्री सुद्धां त्याला अशी कांहीं चिकटली कीं एक क्षण कांहीं ती त्याला विसंबत नसे. तो जाई तिथें ती शेपूट हालवीत त्याच्या मागें असायचीच. त्यानें आपल्या मुकेपणाला अनुसरून तिचं नांव ठेवलं 'मुमु'—सगळ्या नोकरांत मग तिचं तेंच नांव पडलं.

मुमु होती फार चलाख. ती सर्वांकडे जायची, पण जीव लावायची एकट्या गेरासिमला. गेरासिमचाहि तिच्यावर भारीच जीव होता. तिला कोणी नेईल म्हणून, कीं असूया म्हणून, देव जाणे, पण त्याला कोणी तिचे लाड केलेले खपत नसत. मुमु रोज सकाळीं त्याला जागे करी. घोडा तिचा जिवलग दोस्त बनला होता. त्याचा लगाम तोंडांत धरून त्याला ती गेरासिमसमोर आणून उभं करी व मोठ्या नखऱ्याच्या चालीनें नदीवर जाऊन परत येई. गेरासिमचे झाडू-खराटे, बर्फ काढण्याचे पावडे यांवर व एकंदरीनें त्याच्या खोलीवर तिचा कडक पहारा असे.

गेरासिमनें खोलीच्या दाराला खास मुमूला येण्याजाण्यासाठीं एक भोंक केलें व ती जणुं खोलीची मालकीणच, अशा ऐटीनें त्या भोकांतून आंत उडी मारून समाधानानें त्याच्या बिछान्यावर आरूढ होई. ती रात्रभर जागता पहारा देई, पण इतर कुत्र्यांप्रमाणें उगीचच मागच्या पायांवर बसून आणि नाक वर करून ताऱ्यांकडे पाहत नुसतं भुंकायचं म्हणून भुंकत नसे. कुणी अगदींच नवखी व्यक्ति कुंपणाजवळ फिरकली अगर कांहीं संशयास्पद आवाज आला तरच तिचें कर्कश भुंकणें ऐकूं यायचें.

अशा प्रकारें मुमु एका आदर्श राखणदाराचें काम बजावीत होती. त्या आवारांत वोल्चोक नांवाचा दुसरा कुत्रा होता, पण त्याला रात्रीं कधींच मोकळें सोडलें जात नसे. त्यामुळें तो आतां जवळजवळ निरूपयोगी झाला होता व रात्रीं आपल्या कोठींतच पडून असे. मधूनच त्याचें अगदीं क्षीण पण भसाड्या आवाजांतलें भुंकणें ऐकूं येई. पण तेंहि अगदीं मिनिट अर्धा मिनिट ! जणुं त्याला लगेच आपल्या निरूपयोगीपणाची जाणीव होई.

मुमु त्या मोठ्या वाड्यांत कधींच प्रवेश करीत नसे. गेरासिम लाकडं ठेवायला आंत गेला तरी ती बाहेर पायऱ्यांवर कान टवकारून त्याची वाट पाहत बसून राही.

असेंच एक वर्ष आणखी निघून गेलें. आपलें काम बरें कीं आपण बरें अशा सुखासमाधानानें गेरासिम दिवस काढीत होता. अन् मग एक दिवस एक फारच विलक्षण घटना घडली.

उन्हाळ्यांतली एक सुरेख सकाळ होती. मालकीण अति प्रसन्न वृत्तीनें दासींच्या घोळक्यांत दिवाणखान्यांत येरझारा घालीत होती. हसणें खिदळणें, चेष्टामस्करी यांना भरती आली होती. मालकिणीची ही प्रसन्न वृत्ति किती वेळ टिकेल याची दासींना शंकाच होती. उलट पांच मिनिटांतच ही लहर संपून ओरडणें गागणें सुरू होईल अशीच त्यांना खात्री असल्यामुळें त्या मनांतून प्रसन्न नव्हत्या. पण तरी सुद्धां आपण प्रसन्न असलों म्हणजे सर्वांनीं

हंसतमुख असलेंच पाहिजे अशी धनिणीची आज्ञा असल्यामुळें वरकरणी प्रसन्न मुद्रेनें थट्टा मस्करींत त्या सामील झाल्या होत्या.

मालकीण रोज सकाळीं उठतांच पत्त्यांचा डाव लावून दिवस कसा जाणार हें अजमावीत असे, आणि आज तिच्या इच्छेनुसार चारहि गुलाम वर आले होते. चहाहि तिला हवा तसा झकास झाल्यामुळें चहा करणाऱ्या दासीला शाबासकी व दहा कोपेकचें नाणें इनाम म्हणून मिळालें होतें, अन एकंदरीनें दिवसाची सुरवात फारच शुभ–लाभदायक झाली होती.

अशा रीतीनें प्रसन्नचित्त व स्मितवदन अशी ती जर्जर वृद्धा फेऱ्या घालतां घालतां बागेच्या वर असलेल्या खिडकींत आली. तेव्हां अचानक पणें खालीं गुलाबांच्या ताटव्याजवळ एक हाडूक चघळीत असलेली मुमु तिच्या दृष्टीस पडली. मुमूला पाहून ती एकदम उद्गारली, "अय्या! हें कुत्रं कोणाचं ?"

ज्या दासीला उद्देशून धनिणीनें हा प्रश्न केला तिला त्याचा रोख कळला नाहीं. आपली मालकीण मुमूला पाहून खूष झाली आहे कीं नाराज झाली आहे, हें ध्यानांत न आल्यामुळें तिला काय उत्तर द्यावें हें न सुचून ती गोंधळून गेली व चाचरत चाचरत म्हणाली, "म–म–मला वाटतं त्या बहिऱ्या रखवालदाराची कुत्री आहे ती."

हें उत्तर पूर्ण ऐकण्याचीहि वाट न पाहतां धनीण पुढें म्हणाली, "किती छान कुत्री आहे ग बाई! तिला इकडे आणायला सांग त्यांना! अन् त्यानं ही कुत्री आणून किती दिवस झाले? अन् माझ्या कधींच कशी दृष्टीला पडली नाहीं ती? जा जा. तावडतोब इकडे आण तिला!"

दासी लगेच दाराबाहेर पळाली व ओरडून सांगूं लागली, "अरे! त्या मुमूला आंत आणायला सांगा बरं! तिकडे बागेंत आहे ती!"

"असमं! तिला मुमु म्हणतात वाटतं?" मालकीण म्हणाली. "छान आहे अं नांव!"

" हो छान आहे नांव !" दासी मालकिणीला साद देत म्हणाली व ती पुनः ओरडली, " लवकर ! ए, स्तेपान !"

स्तेपान चांगला मजबूत गडी होता. तो वेगानें बागेंत पळाला व त्यानें मुमूवर झडप घातली. पण मुमु कसली वस्ताद ! तिनें तो हल्ला चुकवून गेरासिमकडे धांव घेतली. तो मुका त्यावेळीं एक पिंप लीलेनें उंच धरून रिकामें करण्यांत गुंतला होता. स्तेपान मुमूच्या मागें धांवला तशी ती गेरासिमला घसटून पुनः स्तेपानच्या हातून निसटली. कांहीं वेळ हा पाठलाग सुरू असतां गेरासिम कौतुकानें पाहत राहिला. अखेर स्तेपानच थकला व त्यानें मालकिणीनें मुमुला आणायला सांगितल्याचें खुणांनीं गेरासिमला सांगितलें. गेरासिम आश्चर्यचकित झाला, पण त्यानें मुमूला उचलून स्तेपानच्या स्वाधीन केलें. स्तेपाननें तिला आंत नेऊन मालकिणीसमोर जमिनीवर ठेवलें.

मालकीण मोठ्या प्रेमानें मुमूला जवळ बोलावूं लागली. पण ती कुत्री कसली खट ! त्या भव्य दिवाणखान्याच्या वातावरणांत ती पार बावरली व भयभीत होऊन दरवाजाकडे पळाली. पण तिथें पाय रोवून उभ्या असलेल्या स्तेपाननें तिला अडवून पुनः मालकिणीकडे पिटाळलें तेव्हां ती अंग चोरून कापत कापत भिंतीशीं उभी राहिली.

" मुमू ! चल इकडे ये ! अग, तुझ्या मालकिणीकडे येणार नाहीं तूं ? चल ये ! भितेस काय अशी ?" मालकीण तिला प्रेमानें बोलावूं लागली.

" जा, मुमु ! मालकिणीकडे जा ! जा, जा !" दासीहि सांगूं लागल्या.

पण मुमु बाहेर पळायला वाट शोधत होती. तो मार्ग दिसेना म्हणून ती जागची हालली नाहीं.

" तिला कांहीं खायला आणा पाहूं !" धनिणीनें आज्ञा केली. " काय विलक्षण कुत्री आहे पहा ! मालकिणीकडे यायला सुद्धां घाबरते !"

"अजून तिची तुमची ओळख नाहीं म्हणून !" एका बारक्या आवाजाच्या दासीनें मालकिणीची खुशामत केली. स्तेपाननें एका बशींत दूध आणून मुमूपुढें ठेवलं, पण ती तिकडे ढुंकूनसुद्धां बघेना.

"काय बाई कुत्री तरी !" असे आश्चर्यानें उद्गार काढीत मालकीण मुमूच्या दिशेनें पुढें सरकली व तिनें तिला थोपटण्यासाठीं हात पुढें केला. पण मुमु एकदम चवताळली व तिनें दांत काढले. मालकीण दचकून मागें सरकली.

एक क्षणभर स्तब्धता पसरली. मुमूनें एक क्षीण चीत्कार केला. जणुं ती तक्रार करीत होती व क्षमायाचनाहि करीत होती. वृद्ध मालकीण भिऊन अन् रागावून दूर झाली.

"अगबाई ! ती चावली तर नाहीं ना आपल्याला ?" सर्व दासी काळजीच्या स्वरांत उद्गारल्या. मुमु कधींच कुणाला चावली नव्हती हें त्यांना ठाऊक होतें, तरीसुद्धां त्यांना असें म्हणणें भागच होतें.

"उचला तिला ! दुष्ट, नतद्रष्ट मेली !" मालकीण कापऱ्या आवाजांत उद्गारली. ते शब्द उच्चारीत असतांच ती आंतल्या खोलींत जावयाला निघाली व दासी पाठोपाठ येऊं लागल्या तें पाहून मागें वळून ती त्यांच्यावर खेकसली, "तुमचा ससेमिरा कशाला माझ्यामागें ? मी तुम्हांला यायला सांगितलं का ? मग चला व्हा बाजूला !"

मालकीण निघून जातांच त्या दासींनीं स्तेपानला खूण करून मुमूला घेऊन जायला सांगितलं. त्यानें लगेच तिला उचलून बाहेर फेकलं तें ती सरळ बाहेर उभ्या असलेल्या गेरासिमपाशींच जाऊन आदळली.

त्यानंतर अर्धा तास लोटला तरी त्या वाड्यांत पसरलेली निस्तब्ध शांतता ओसरली नव्हती. घराची वृद्ध मालकीण कोचावर स्तब्ध बसली होती व वादळी ढगापेक्षांहि काळवंडलेली तिची मुद्रा उग्र दिसत होती...

वस्तुतः मुमूची बाब किती क्षुल्लक! पण तेवढ्यावरून त्या वृद्धेच्या अंगाची लाहीलाही झाली होती!

सारा दिवस ती कुणाशीं बोलली नाहीं, पत्त्यांना शिवली नाहीं अन् रात्रीं पलंगावर पडूनहि तिला स्वस्थ झोंप लागली नाहीं. आज दासींनीं दिलेलं कोलनवाटरच नकली होतं, उशीच्या अभ्र्याला साबणाचा वास येत होता, असं सारखं तिचं कुरकुरणं सुरू होतं. तिनें मेट्रनला सगळ्या कपड्याचा वास घ्यायला लाविलें. थोडक्यांत म्हणजे तिच्या रागाचा पारा खूपच चढला होता.

सारी रात्र अशा बेचैनींत घालवल्यावर तिनें उजाडतां उजाडतांच गाव्रिलोला बोलावून घेतलं. तो आला तों भीतभीतच. त्याला पाहतांच ती उपरोधिक स्वरांत म्हणाली, "का हो मेहेरबान! आपल्या आवारांत रात्रभर कोणतं कुतरडं भुंकत होतं हें कृपा करून सांगाल कां? सारी रात्र माझा डोळ्याला डोळा लागला नाहीं!"

"कुत्रं? कोणतं कुत्रं? त्या मुक्याची कुत्री तर नव्हे?" गाव्रिलो चाचरत म्हणाला.

"मुक्याचं कीं आणखी कुणाचं कुत्रं, तें मला ठाऊक नाहीं! सारी रात्र त्यानं मला जागवलं एवढंच मी जाणतें. अन् का रे, इतकीं कुत्रीं आपल्या आवारांत हवींतच कशाला? आपला एक जुना राखणीचा कुत्रा आहे ना?"

"जी! वोल्चोक नांव आहे त्याचं."

"झालं तर मग. जास्त कुत्रीं बाळगून नसती कटकट मात्र वाढते. तुझा घरात वचक उरला नाहीं हाच याचा अर्थ आहे, दुसरं काय? अन् त्या मुक्याला कुत्रं कशाला लागतं? माझ्या घरांत कुत्रं बाळगायची त्याला

परवानगीच कुणी दिली ? काल मी खिडकींतून बागेंत पांहिलं तर त्याची ती कुत्री त्या माझ्या गुलाबाच्या ताटव्याशींच कसलं घाणेरडं हाडूक घेऊन बसली होती—"

एक क्षणभर थांबून म्हातारीनें हुकुमी आवाजांत बजावलं, "ती कुत्री आजच गेली पांहिजे--काय, समजलं ? "

" होय बाईसाहेब ! "

" आजच बरं का ! बरं. जा आतां ! बाकी कामाचं मग पाहीन मी ! "

गाव्रिलो तेथून निघाला. जातांना त्यानें 'टापटिपीच्या दृष्टीनें' एका टेबलावरची घंटा उचलून दुसऱ्या टेबलावर ठेवली आणि पक्षाच्या चोंचीसारखें आपलें नाक साफ करून तो बाहेर पडला. स्तेपान एका खिडकीच्या फरशीवर एखाद्या जखमी योद्धयासारखा पडला होता, त्याला गाव्रिलोनें हालवून जागं केलं व हलक्या आवाजांत कांहीं आज्ञा दिली. ती आज्ञा ऐकून स्तेपाननें स्मित केलं पण जांभईच्या मिषानें तें दाबून टाकून तो लगेच कपडे चढवून खालीं आवारांत पोंचला. पांचच मिनिटांत गेरासिम एक भलामोठा लाकडाचा भारा खांद्यावर घेऊन तेथें आला व त्याच्या पाठोपाठ मुमूची स्वारीहि आंत शिरली. ( उन्हाळयाच्या दिवसांत मुद्धा बसायची खोली व न्हाणीघर गरम राहिलंच पाहिजे अशी मालकिणीची नोकरांना सक्त ताकीद होती. ) गेरासिमनें खांद्यानेंच दार ढकलून आत वाड्यांत प्रवेश केला व मुमु नेहमींप्रमाणें बाहेर पायऱ्यांवरच थांबली. स्तेपान बाजूला उभा होता. त्यानें अचूक ती संधि साधून, घारीनें कोंबडीच्या पिलावर झडप घालावी, तशी मुमूवर झडप घातली व तिला बगलेंत मारून तो धांवतच रस्त्यावर आला. समोर दिसली ती पहिलीच गाडी थांबवून तो आंत शिरला. त्यानें गाडीवाल्याला गाडी ओखोतनी रायद् भागाकडे भरधाव घेण्याचा हुकूम सोडला.

म. ग्रं. सं. ठाणे. ग्रंथालय शाखा.
क्र. ६०६६ नों. दि.
वि. बा. ची.

तिथें येताच त्यानें बाजारांत अर्ध्या रूबलच्या मोबदल्यांत मुमूचा सौदा करून टाकला. त्यानें फक्त एवढीच अट घातली कीं एक आठवडाभर मुमूला साखळीनें बांधून ठेवलं पाहिजे.

नंतर त्याच गाडीनें स्तेपान परत आला, पण वाड्यापाशीं पोंचण्याच्या थोड्या आधींच त्यानें गाडी सोडून दिली व गेरासिमच्या भीतीनें तो पुढच्या फाटकांतून न येतां कुंपणावरून उडी मारून आंत शिरला.

पण खरं पाहिलं तर तो पुढच्या फाटकानें येता तरी हरकत नव्हती. कारण गेरासिम आवारांत नव्हताच. आंत लाकडं टाकून बाहेर येतांच मुमु नाहीं हें त्याला दिसून आलं. तो बाहेर आल्यावर मुमु त्याची वाट पाहत पायऱ्यांवर बसलेली नाहीं, असं कधींच घडलं नव्हतं. म्हणून तो तिला सगळीकडे शोधूं लागला व आपल्या नेहमींच्या गेंगाण्या सुरांत हांक मारूं लागला. आजपर्यंत मुमु त्याला सोडून कुठंच गेली नव्हती. पण आज ती खोलींत नव्हती, रस्त्यावर नव्हती, कुठंच नव्हती ! मुमु हरवली होती ! त्यानें सगळ्या नोकरांना खुणांनीं विचारलें. जमिनीपासून अर्धा फूट वर हात धरून इतक्या उंचीची ती कुत्री कुठं आहे, म्हणून त्यानें चौकशी केली. कांहींना खरंच ठाऊक नव्हतं, त्यांनीं नुसत्या माना हालवल्या. कांहींना माहीत होतं, पण त्यांनीं दांत विचकून 'माहीत नाहीं' चा आव आणला. अन् गावृरिलोनें तर खरंच चिंतातुर झाल्याचं सोंग आणून नोकरांवर रागावल्याचाहि देखावा केला. अशा रीतीनें कुठंच मुमूचा पत्ता लागेना तेव्हां गेरासिम तिला शोधण्यासाठीं बाहेर पडला.

तो परत आला तेव्हां काळोखाची वेळ होती. त्याचे तारवटलेले डोळे, जड पावलें, धुळीनें माखलेले कपडे, यावरून त्यानं अर्धे तरी मॉस्को शहर पालथं घातलं असणार हें उघड होतं. तो आत येतांच मालकिणीच्या खोलीच्या खिडक्यासमोर उभा राहिला. पोर्चमध्यें सात आठ गडीमाणसं घोळका करून उभीं होतीं तिकडे एक नजर टाकून त्यानें एकदा जोरांत गेंगाण्या

सुरांत हांक मारली: ‘ मुमुऽऽ ’, पण मुमु आली नाहीं. गेरासिम लगेच तिथून खोलींकडे वळला. सगळेजण त्याच्याकडे पाहत राहिले, पण कोणीच कांहीं बोललं नाहीं वा स्मित केलं नाहीं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं फटींतून पाहण्याची सवय असलेल्या चोंबड्या आंतिप्कानें त्यांना बातमी दिली कीं सारी रात्र तो मुका उसासे टाकीत होता...

दुसऱ्या दिवशीं गेरासिम खोलींतून बाहेरच पडला नाहीं. पोताप नांवाच्या नोकराला पाणी आणण्याच्या कामाचा तिटकारा होता तरी त्याला तें करावं लागलं. मालकिणीनें आपला हुकुम अमलात आणला का म्हणून विचारलं तेव्हां गावूरिलोनें होकारार्थी उत्तर दिलं.

तिसऱ्या दिवशीं गेरासिम नेहमींच्या कामाला लागला. जेवणाच्या टेबलावर कुणाकडेहि लक्ष न देतांच तो जेवून उठून गेला. आतां त्याचा चेहरा दगडासारखा निर्विकार होता. जेवणानंतर तो गवतावर पडून राहिला. रात्रींचें शांत चांदणें पाहत तो तळमळत पडला असतां अचानक त्याचा कोट खेंचला गेला. पण त्यानें डोकें वर उचलून बघितलेंहि नाहीं. पण पुनः कोट खेंचला गेला, म्हणून तो उठून पाहतो तों काय ? प्रत्यक्ष मुमूच त्याच्या समोर शेपूट हालवीत उभी होती. तिच्या गळयांत एक दोरी लोंबत होती. गेरासिमनें अत्यानंदानें एक चीत्कार काढला व मुमूला छातीशीं धरून कवटाळलें. तीहि आनंदानें त्याचें नाक, डोळे व दाढीमिशा चाटूं लागली.

थोडा वेळ त्या अवस्थेंत गेल्यावर गेरासिम उठला व कुणीं पाहत नाहीं अशी खात्री करून घेऊन खोलींत पोंचला. मुमु हरवली नसून मालकिणीच्या आज्ञेवरून कुणीतरी तिला पळवून नेली याबद्दल त्याची खात्री होती. मुमु मालकिणीवर कशी गुरगुरली हें कांहीं नोकरांनीं त्याला खुणेनें सांगितलें होतें, त्यावरून काय झालें असावें याचा त्यानें अचूक अंदाज

बांधला होता व आतां तसें न होऊं देण्याची पूर्ण खबरदारी घेण्याचें त्यानें ठरवलें होतें.

तिला त्यानें प्रथम थोडी भाकरी खाऊं घातली व प्रेमानें कुरवाळून झोंपवलें. मग तो विचार करूं लागला. तिला कसं लपवून ठेवावं हाच तो रात्रभर विचार करीत होता व अखेर त्यानें ठरवलें कीं तिला दिवसा खोलींतच ठेवायचें, मधून मधून तिला पाहून जायचें व फक्त रात्रींच बाहेर काढायचें. सकाळीं बाहेर पडण्यापूर्वी त्यानें दाराचें भोंक एक जुना कोट खुपसून बंद केलें व जणुं काय कांहीं घडलेंच नाहीं अशा चेहऱ्यानें तो आवारांत कामाला लागला. त्या भोळया जिवानें आपल्या चेहऱ्यावरील दोन दिवसांचा दुःखी भाव कायम ठेवण्याची हुशारी दाखवली खरी, पण मुमु स्वतःच आपल्या ओरडण्यानें आपल्या अस्तित्वाची जाणीव घरादाराला करून देईल, ही शंका त्याच्या भाबड्या मनांत आलीच नाहीं ! पण जें व्हायचं तें झालंच ! थोड्याच वेळांत मुमु परत आल्याचें व खोलींत बंद करून ठेवली असल्याचें सर्वांना कळून आलं. पण मुमु व गेरासिम या दोघांविषयीं करुणा वाटून व अंशतः गेरासिमच्या भीतीनें त्याचें गुपित कळल्याचें त्याला कुणी दर्शविलें नाहीं. एकटा गाव्रिलो मात्र चिंतातुर झाला, पण त्यानेंहि मनाशीं विचार केला कीं मालकिणीपर्यंत ही गोष्ट गेली नाहीं म्हणजे झालं !

गेरासिमनें त्या दिवशीं फारच उत्साहानें कामं पार पाडलीं. आवाराची सफाई, गवत काढणं, बागेच्या कुंपणाचे खांब पक्के आहेत कीं नाहीं हें पाहणं, अशी नित्य व नैमित्तिक कामंहि त्यानें इतक्या तत्परतेनें पार पाडलीं व इतकी हालचाल केली कीं आजचा त्याचा उत्साह खुद्द धनिणीच्या सुद्धां नजरेंत भरला. दिवसा एकदोनदां सर्वांची नजर चुकवून तो खोलींत जाऊन मुमूला पाहून आला आणि रात्रींसुद्धां तो नेहमींप्रमाणें तिला बाहेर न काढतां खोलींतच तिच्याजवळ पडून राहिला.

रात्रीं एक वाजून गेल्यावर सगळीकडे सामसूम झालेली पाहून गेरासिमनें मुमूला मोकळी हवा खाण्यासाठीं बाहेर काढलें व दूरपर्यंत भटकवून आणलें. पण तो परत येऊन खोलींत जाणार, तोंच कुंपणाच्या बाहेर गल्लींत कसला तरी आवाज झाला अन् मुमु कान टवकारून तिकडे पळाली व तिनें तिथें हुंगून जोरानें भुंकण्याला सुरवात केली. कुणीतरी दारू पिऊन झिंगलेला इसम तिथें धडपडला होता व म्हणूनच मुमु भुंकत होती.

योगायोग असा कीं नेमका त्याच वेळीं आंत मालकिणीचा डोळा लागत होता. मनासारखं जेवण झाल्यावर तिला नेहमींच दोनचार तास ' अस्वस्थ ' वाटे, तसंच आजहि होऊन ती नुकतीच झोंपली होती. मुमूच्या भुंकण्यानें ती दचकून उठली व तिची छाती धडधडूं लागली अन् मग एकदम ती धडधड बंदच झाल्याचा तिला भास झाला. ती ओरडली, " पोरींनो ! अग पोरींनो ! " तिच्या किंकाळ्या ऐकून दासी आंत शिरतांच ती छाती पिटीत ओरडूं लागली, " मेल्यें ग मेल्यें ! ती कुत्री ! तीच ती ! आली ग मेली माझा प्राण घ्यायला !...डॉक्टरला तरी बोलवा ग !..." इतकं ओरडून आपण बेशुद्ध होत आहोंत असं दाखविण्यासाठीं तिनें मान मागें झोकून दिली.

त्या घरांत मालकिणीच्या दिमतीला खारितोव नामक खास डॉक्टर होता. त्याचं सारं कौशल्य फेल्टचे जोडे घालणें व नाजूकपणें रोग्याची नाडी पाहणें यांतच साठवलेलं होतं. तो चोवीस तासांपैकीं चौदा तास झोपेंत घालवी व बाकीचे दहा तास मालकिणीला एक ठराविक औषध देणं अन् वारंवार येणाऱ्या तिच्या बोलावण्याची वाट पाहणं यांत निघून जात. असा हा डॉक्टर दासी बोलवायला येतांच धांवतच मालकिणीच्या खोलीत आला. त्यानें प्रथम पिसं जाळून धूर केला व मालकिणीनें डोळे उघडतांच एका लहान पेल्यांत तिचं नेहमींचं औषध घालून छोट्या चांदीच्या तबकांत तो पेला तिच्यापुढं धरला. तिनें आधाशीपणानें तें औषध घशात ढकललें अन् मग डोळ्यांत आंसवें आणून तिची बडबड पुनः सुरू झाली. ती कुत्री भयंकर आहे,

गाव्रिलोचा निष्काळजीपणा वाढत आहे, आपल्या म्हातारपणीं सर्वच लोक आपल्याविषयीं बेपर्वाई दाखवीत आहेत, आपल्या मरणाची वाट पाहत आहेत, हेच तिच्या बडबडीचे विषय होते.

हें चालूं असतांना बाहेर मुमु भुंकतच होती व तिला तेथून घेऊन जाण्याचे गेरासिमचे सर्व प्रयत्न व्यर्थ ठरत होते. तें भुंकणें ऐकून मालकीण पुनः दचकून ओरडूं लागली व तिनें डोळे गरगरा फिरवले. हा प्रकार पाहून डॉक्टरनें एका दासीच्या कानांत कांहींतरी सांगितलें, तें ऐकून तिनें बाहेर जाऊन स्तेपानला उठवलें, त्यानें गाव्रिलोला व गाव्रिलोनें सगळ्या घरादाराला खडबडून जागें केलें.

आंत वाड्यांत गडबड सुरू होऊन दिवे लागलेले पाहतांच गेरासिमला आगामी संकटाची सूचना मिळाली. तो मुमूला उचलून खोलींत पळाला व आंतून दार लावून बसला. थोड्याच वेळांत पांच गडी तेथें येऊन थडकले व त्यांनीं दारावर धक्के मारण्याला सुरवात केली, पण आंतून दार पक्कें बंद पाहून ते हताश झाले. गाव्रिलो फारच अस्वस्थ अवस्थेंत तेथें आला व त्यानें त्या गड्यांना सकाळपर्यंत तेथेंच थांबून दारावर पहारा करण्यास बजावलें. नंतर त्यानें मालकिणीची खास परिचारिका व स्वयंपाक घरांतील खरेदींतील त्याची विश्वासू भागीदारीण ल्युबिमोव्ना हिच्या हातीं मालकिणीला निरोप पाठविला कीं, दुर्दैवानें ती कुत्री परत आली असली तरी दुसऱ्याच दिवशीं तिला ठार करण्यांत हयगय होणार नाहीं, तरी कृपा करून रात्रभर शांत राहून स्वस्थ चित्तानें झोंपी जावें. या निरोपानें मालकिणीचें भडकलेलें माथें शांत होण्याचा फारसा संभव नव्हता, पण डॉक्टरनें गडबडींत औषधाचे बाराऐवजीं चांगले चाळीस थेंब तिला पाजले. त्याचा परिणाम होऊन पंधरा मिनिटांच्या आंतच तिला गुंगी आली व मग कुठें तें वादळ शमलें. तिकडे बिचारा गेरासिम मात्र जणुं आपलें मरणच ओढवलें आहे अशा अवस्थेंत मुमूचें तोंड घट्ट दाबून ठेवून बिछान्यावर तळमळत पडला होता.

सकाळीं मालकीण पुष्कळच उशीरा जागी झाली. गेरासिमच्या खोलीचा दरवाजा फोडण्यापूर्वी मालकीण जागी व्हावी म्हणून गावूरिलो वाट पहात होता. तसेंच ती उठल्यावर होणाऱ्या भयंकर वादळाला तोंड देण्याचीहि त्यानें मनाची तयारी केली होती.

पण वादळ झालेंच नाहीं. मालकिणीनें नेहमींचा आवेश सोडून आपला फार छळ होतो आहे अशा दीनवाण्या स्त्रीचें सोंग आणलें होतें. अशा वेळीं सर्वच नोकरचाकर अतिशय अस्वस्थ होत असत.

"ल्युब्रोव ल्युबिमोव्ना," एखाद्या अशक्त माणसासारखा आवाज काढून ती म्हणाली. "ही पाहिलीस माझी दुर्दशा ! गावूरिलो आंद्रेइचकडे जाऊन म्हणावं, बाबा रे ! तुझ्या मालकिणीच्या प्राणापेक्षां तुला ती कुठली भिकारडी कुत्री जास्त वाटते का ? जा बाई, तूं फार चांगली आहेस. कृपा करून गावूरिलोला सांग जरा."

परिचारिकेनें कोणत्या शब्दांत हा निरोप त्याला कळवला हें समजण्याला मार्ग नाहीं, पण अल्पावधींतच गडीमाणसांचें एक भलें मोठें टोळकें गेरासिमच्या खोलीकडे निघालें. गावूरिलो स्वतः टोपी चढवून पुढें झाला होता अन् बाकीचे नोकर मागें होते. ख्वोस्तकाका मात्र बाजूच्या खिडकींतून हुकूम सोडल्यागत हातवारे करीत होता. त्या घरांत नसलेलीं बरींचशीं पोरंहि गंमत म्हणून उड्या मारीत त्या घोळक्यांत सामील झालीं होतीं.

गेरासिमच्या खोलीसमोरच्या जिन्यांत हीं सगळी मंडळी मोर्चे बांधून उभीं झाल्यावर गावूरिलोनें दारावर धक्के देण्यास व ओरडण्यास सुरवात केली, "दार उघड ! ए ! दार उघडतोस कीं नाहीं ?" दोन तीनदां हा प्रकार होऊनहि आंतून दबलेल्या आवाजांतील भुंकण्याखेरीज कसलाच आवाज आला नाहीं, तेव्हां खालच्या पायरीवरून स्तेपान ओरडला,

"गावूरिलो ! अरे तो मुका बहिराहि आहे ! त्याला काय ऐकूं येणार, कपाळ !"

३१
२९९३३

सगळे जोरांत हंसले.

गाव्रिलोनें जरा वरमून विचारलें, " मग आतां कस करायचं ? "

" त्या दरवाजाला एक भोक आहे," स्तेपाननें सल्ला दिला, " त्यांतून काठी घालून फिरव."

गाव्रिलोनें वाकून पाहून सांगितलं, " कोट का :काहींतरी घालून तें भोक बंद केलंय."

" अरे, तें आंत ढकलून दे म्हणजे झालं ! "

पुनः आंतून भुंकण्याचा क्षीण आवाज आला.

" हं. त्याला ऐकूं येत नसलं तरी ती स्वतःच सांगते आहे ! " कुणीतरी म्हणालं व पुनः सगळे हंसले.

गाव्रिलोनें कान खाजवले व तो स्तेपानला म्हणाला, " एवढं म्हणतोस तर तूंच ढकल कीं तो कोट आंत ! "

" हो ! त्यांत काय मोठं ? " असें म्हणत स्तेपान वर आला व काठी घेऊन त्यानें कोट आंत ढकलला आणि ती आंत फिरवीत पुटपुटला, " हं, चल ये बाहेर ! "

तो अशी काठी फिरवीत असतानांच अचानकपणं दरवाजा एकदम बाहेर ढकलला गेला व ते सगळे जिन्यांतून खालीं कोलमडले. गाव्रिलो तर जोरांतच आदळला. समोर खिडकींतून गंमत पाहणाऱ्या ख्वोस्तकाकांनींहि तें पाहून खिडकीचा दरवाजा लावून घेतला.

गाव्रिलो खालून ओरडला, " चल ये खालीं ! आतां जाशील कुठं ? "

गेरासिम दारांत स्तब्ध उभा राहिला. सर्व नोकर पुन्हां खालच्या पायरीजवळ गोळा झाले. आपल्या कमरेवर हात ठेवून तो त्या जर्मन फॅशनचे

कोट घातलेल्या लोकांकडे तुच्छतेनें पाहत होता. खेडवळ थाटाच्या शेंदरी सदऱ्यांतील गेरासिम म्हणजे त्या माणसांपुढें एक राक्षसच उभा आहे असें वाटत होतें.

गाव्रिलो पुढें येऊन बोलूं लागला, " गड्या! हें काय चालवलं आहेस तूं? याचे परिणाम ठीक होणार नाहींत!"

आणि मग गाव्रिलो त्याला खुणांनीं सांगण्याचा प्रयत्न करूं लागला कीं त्याची कुत्री ताबडतोब स्वाधीन करण्याचा मालकिणीचा हुकूम आहे व तो मानला नाहीं तर भयंकर परिणाम होणार आहेत.

गेरासिमनें त्याच्याकडे पाहिलं, नंतर मुमूकडे बोट दाखवलें, आपल्या मानेभोंवती बोट फिरवून गांठ आवळतात तशी खूण केली व प्रश्नार्थक मुद्रेनें तो गाव्रिलोकडे पाहूं लागली.

गाव्रिलोनेंहि होकारार्थी मान हालवली व तोंडानेंहि तो म्हणाला, " हो, तेंच! बरोबर!"

गेरासिमनें नजर खाली घातली, अंगावर शहारे आल्यासारखे त्यानें अंग हालविलें व त्याच्याजवळ कान टवकारून शेपूट हालवीत भाबडेपणानें उभ्या असलेल्या मुमूकडे पाहिलें. मग त्यानें गळा आवळण्याची खूण करून स्वतःच्या छातीवर हात ठोकला. आपण स्वतःच तिचा जीव घेऊं, असेंच तो सुचवीत होता.

" नाहीं! तूं फसवशील!" गाव्रिलोनें खुणेनें सांगितलें.

गेरासिमनें एक तीक्ष्ण नजर टाकली, तुच्छतादर्शक स्मित केलें व ' मीच तें काम करीन ' असें सूचित करण्यासाठीं पुनः एकदां छाती ठोकली व त्यानें आंतून दार बंद करून घेतलें.

घोळक्यांतल्या लोकांनीं एकमेकांकडे पाहिलें व मग गाव्रिलो उद्गारला, " याचा अर्थ काय? त्यानें तर पुनः दार आंतून बंद करून घेतलं! आतां?"

" राहूं दे त्याला आंतच ! " स्तेपान म्हणाला. " तो नक्की आपला शब्द खरा करून दाखवील. आजवर तो कधींच खोट्यांत शिरला नाहीं. आपणा सर्वांपेक्षां तो निराळा आहे. आपण त्याच्यावर भरंवसा ठेवूं या ! "

" तें मात्र खरं आहे ! तो शब्दाचा फार सच्चा आहे, " इतरांनीं स्तेपानला साथ दिली.

ख्रोस्ताकाकाहि खिडकी उघडून बोलले, " तें खरं आहे. "

" बरं बरं. आपण पाहूंच आतां," गावूरिलो कबूल झाला. " तरीपण आपण त्याच्यावर लक्ष ठेवलंच पाहिजे. ए, येरोश्का ! " माळ्याला हांक मारून गावूरिलोनें त्याला बजावलें, " नाहींतरी तूं रिकामाच बसतोस ! एक काठी घेऊन इथेंच बैस, अन् कांहीं झालं तर पळत मला सांगायला ये ! "

येरोश्का काठी घेऊन तेथें थांबला. थोडे बघे व कांहीं मुलं सोडून बाकी लोक तिथून पांगले. गावूरिलो घरांत गेला व ल्युबिमोव्नाच्या मार्फत त्यानें मालकिणीला तिची आज्ञा अमलांत आणली गेल्याचा निरोप पाठवला. त्याचबरोबर ज्यादा खबरदारी म्हणून त्यानें घोड्यावर एक माणूस पाठवून पोलिसालाहि मदतीला बोलावलें.

गावूरिलोचा निरोप मिळाल्यावर मालकिणीनं रुमालाची गांठ बांधून तीवर कोलन वॉटर शिंपडून त्याचा वास घेतला. त्यानें कपाळ चोळलें, चहा घेतला व गुंगीच्या औषधाचा परिणाम अजूनहि गेला नसल्यामुळें ती पुनः झोंपी गेली.

गेरासिमच्या खोलीसमोरचं वादळ मंपल्यावर सुमारें तासाभरानें त्यानें दरवाजा उघडला. त्यानें आपला सर्वांत उत्तम कोट घातला होता व मुमूच्या गळयांत दोरी बांधून तिचें एक टोक हातांत धरलें होतें. तो बाहेर पडतांच दाराशीं बसलेल्या येरोश्कानें त्याला वाट करून दिली. तो सरळ फाटकाकडे गेला. आवारांत थांबलेली मुलं माणसं त्याच्याकडे पाहत होतीं पण त्यानें ढुंकूनहि कुणाकडे पाहिलं नाहीं. हातांत धरलेली टोपी त्यानें फाटकाबाहेर

पडतांच डोक्यांवर चढवली व तो चालूं लागला. गावूरिलोनें येरोश्काला त्याच्या मागें धाडलें. त्यानें गेरासिमला एका खानावळींत शिरतांना पाहिलें व तो जरा अंतरावर बसून त्याची वाट पाहूं लागला.

त्या खानावळींत गेरासिम नवखा नसल्यामुळें त्याच्या खाणाखुणाचा अर्थ बरोबर ओळखून त्याला कोबीचें सूप व मटण देण्यांत आलें. मुमु त्याच्या बाजूलाच शांतपणें उभी होती. तिचे बुद्धिमान् डोळे त्याच्या अंतरंगाचा ठाव घेऊं पाहत होते. तिचे केस साफ व चकाकदार, नुकतेच नीट केल्यागत दिसत होते. त्यानें पावाचे व मांसाचे बारीक तुकडे घालून सूप मुमूपुढें ठेवलें व ती नेहमींप्रमाणें अत्यंत कौशल्यानें, जरासुद्धां न सांडतां तें खाऊं लागली. गेरासिम सारखा तिच्याकडे डोळे भरून पाहत होता. तसें पाहत असतांनाच त्याच्या नेत्रांतून दोन टपोरे थेंब ओघळले. एक मुमूच्या गोल मस्तकावर व दुसरा तिच्या समोरच्या थाळींत पडला. त्यानें तळहातांत तोंड झांकून घेऊन दुःखाचे कढ दाबून धरले. अर्धें अधिक सूप संपल्यावर मुमूचें खाणें संपलें. गेरासिमनें पैसे दिले व तो बाहेर पडला तेव्हां त्याच्या वागण्यानें विस्मित झालेल्या वेटरची नजर त्याच्याकडे लागली होती. गेरासिम बाहेर पडून थोडा पुढें गेल्यावर येरोश्काहि त्याच्या मागोमाग चालूं लागला.

गेरासिम संथ पावलें टाकीत, मुमूची दोरी धरून चालत होता. कोपऱ्यावर पोचल्यावर क्षणभर थांबून त्यानें विचार केला व मग तो क्रिम्स्की फोर्डच्या दिशेनें जलद चालूं लागला. वाटेंत एका घराचें बांधकाम सुरू होतें तेथें थांबून त्यानें दोन विटा उचलून घेतल्या. क्रिम्स्की फोर्डपाशीं आल्यावर तो नदीकडे वळून किनाऱ्यानें निघाला व एका ठिकाणीं दोन बोटी बांधून ठेवलेल्या त्यानें पाहून ठेवल्या होत्या, तेथें येऊन तो थांबला. त्यांपैकीं एका बोटींत त्यानें मुमूसहित उडी मारली व दोरी सोडून वल्हीं मारण्याला आरंभ केला.

किनाऱ्यावरच एका मळ्यांतील झोंपडींतुन एक लंगडा माणूस नाव पाण्यांत शिरल्याचा आवाज ऐकून बाहेर आला व गेरासिमला परत येण्यास ओरडूं लागला. गेरासिमनें त्याच्याकडे पाहून नुसती मान हालवली व नाव जलौघाच्या विरुद्ध दिशेनें जात असतांहि इतक्या जोरानें वल्हीं मारलीं कीं अल्पावधींतच तो दोनशें यार्डांपेक्षां अधिक अंतर कापून गेला. किनाऱ्यावरच्या लंगड्यानें तें पाहून प्रथम डाव्या व नंतर उजव्या हातानें पाठ खाजवली व तो गेरासिमचा नाद सोडून आंत गेला.

बराच वेळपर्यंत गेरासिम सारखा वल्हीं मारीत होता. अल्पावधींतच शहर वस्ती मागें पडली. दोन्ही बाजूला शेतं, कुरणं, भाज्यांचे मळे, जंगलें, झोपड्या असलीं दृश्यें दिसूं लागलीं. मग गेरासिमनें वल्ह्यांवरील पकड ढिली केली व समोरच्या फळीवर बसलेल्या मुमूच्या मस्तकावर गाल व पाठीवर हात ठेवून तो स्वस्थ बसून राहिला. नावेंत तळाशीं पाणी साचलें होतें, पण फळीवरील जागा अजून कोरडी होती. त्यानें वल्हीं मारणें बंद केल्यामुळें नाव हळूहळू प्रवाहाबरोबर वाहात मॉस्को शहराकडे परत चालली होती.

बराच वेळ मुमूला कुरवाळल्यानंतर गेरासिम उठून बसला, त्याच्या चेहऱ्यावर कटु निर्धाराचे भाव दिसूं लागले. त्यानें झटपट एक दोरी त्या दोन्ही विटांना बांधली, मध्यें एक गांठ करून ती मुमूच्या गळयांत अडकवली व तिच्याकडे शेवटचे पाहून घेतलें......मुमुहि त्याच्याकडे पाहत होती. त्याच्यावरच्या पूर्ण विश्वासामुळें तिच्या डोळ्यांत भीतीचा लवलेशहि नव्हता. ती नेहमींप्रमाणेंच शेपूट हालवीत होती. गेरासिमनें तिला उचलून नदीच्या पात्रावर धरलें, स्वतःचे डोळे घट्ट मिटून घेतले व मग एकदम हात सोडून दिले ! त्याच्या कानांत कसलाच आवाज शिरला नाहीं. मुमूनें खालीं पडतांना काढलेला क्षीण चीत्कार, पाणी उसळल्याचा आवाज, कांहींच त्याला ऐकूं आलें नाहीं. त्याच्या जीवनांतील सर्वांत प्रचंड खळबळीचा तो क्षण पूर्णपणें

स्तब्ध व शांत होता...अगदीं शांत रात्र आपल्याला जितकी स्तब्ध भासते त्यापेक्षांहि शांत नि स्तब्ध !

त्यानें पुनः डोळे उघडून पाहिलें तेव्हां जलप्रवाहावरील मंद तरंग अजूनहि पाठशिवणीचा खेळ खेळत होते, अजूनहि त्या लाटा नावेवर आपटून फुटत होत्या, आणि त्याच्यापासून पुष्कळ दूर, किनाऱ्यालगत एका ठिकाणीं पाण्याचीं वर्तुळें मोठमोठीं होत होतीं.

गेरासिमचा पाठलाग करणाऱ्या येरोश्कानें त्याला नावेंत बसून दूर जातांना पाहिलें व तो दृष्टीआड होईपर्यंत किनाऱ्यावर थांबून मग तो वाड्यांत परतला व त्यानें आपण काय काय पाहिलें तें सर्वांना सांगितलें.

"तो नक्कीच त्या कुत्रीला नदीचा तळ दाखवील," स्तेपान म्हणाला. "त्यानें शब्द दिला आहे आणि तो शब्द खरा केल्यावांचून तो राहणार नाहीं..."

तो सबंध दिवस गेरासिम कुणाच्या दृष्टीस पडला नाहीं. दुपारच्या जेवणाला तो हजर नव्हता. रात्रींच्या जेवणाच्या वेळींहि त्याचा पत्ता नव्हता.

"मला तर बाई त्याचं फारच आश्चर्य वाटतं," कपडे धुण्याचं काम करणाऱ्या लठ्ठ मोलकरणीनें सांगून टाकलं. "एका एवढ्याशा कुत्रीसाठीं इतका त्रागा अन् इतकं संतापणं ! कमाल आहे ग बाई !"

"पण मी त्याला परत आलेला पाहिला कीं !" कांजी पितां पितां स्तेपाननें बातमी दिली.

"खरंच ! केव्हां ?"

"आत्तांच, ताम दोन तासांपूर्वीं ! फाटकाशींच भेटला मला. तो पुनः बाहेर जात होता. मी त्याला त्याच्या कुत्रीबद्दल विचारणार होतों, पण तो फार घुश्शांत दिसला. मी नुसतं बाजूला व्हावं म्हणून त्यानें मला हातानं

ढकललं. पण तो असा जोराचा धक्का होता कीं —अयाई ग !—अजून सुद्धां माझ्या बरगडींत दुखतं आहे ! त्याचे हात म्हणजे लोखंडाचे आहेत कीं काय कुणास ठाऊक !" स्तेपान पाठ चोळीत म्हणाला.

स्तेपानला ठोसा मिळाल्याचं ऐकून सर्वजण मोठ्यानें हंसले. जेवण संपल्यानंतर सर्व मंडळी पांगली.

इकडे त्यांची ही चर्चा चालू होती त्याचवेळीं एक धिप्पाड व्यक्ति पाठीवर एक गाठोडें व हातांत एक जाडजूड सोटा घेऊन भराभर पावलें टाकीत रस्त्यानें चालली होती. तो गेरासिमच होता. तो अगदीं लगबगीनें आपल्या मूळ गांवीं निघाला होता. त्याला तिथें पोंचण्याची भयंकर घाई झाली होती.

बिचाऱ्या मुमूला नदींत बुडवून परत आल्यावर त्याने घाईघाईनें आपली सर्व चीजवस्त एकत्र करून एका जुन्या खोगिराच्या कपड्यांत बांधली व तें गाठोडें उचलून तो तडक चालूं लागला. तो प्रथम मॉस्कोला आला तेव्हां रस्त्याच्या खाणाखुणा त्यानें नीट पाहून ठेवल्या होत्या. हमरस्त्यापासून त्याचें गांव पंचवीस वेर्स्तच्या अंतरावर होतें. त्याच्या चालींत कधींच न खचणारें धैर्य, निराशा आणि त्याचबरोबर आनंदमय निर्धार दिसून येत होता. त्याची छाती उघडी होती आणि त्याचे डोळे हेतूपूर्णरीत्या व आतुरतेनें समोर पाहत होते. आपण अनोळखी देशांत आणि अनोळखी माणसांत प्रवासाला गेलों होतो आणि आपली म्हातारी आई आपली वाट पाहत असून आपल्याला परत बोलावीत आहे, जणुं काय याच कल्पनेनें भारून गेल्यासारखा तो भराभर चालत होता. उन्हाळयाचे दिवस असून सूर्य नुकतांच मावळला होता. अजून वातावरणांतली उष्णता पूर्णपणें शमली नव्हती. सूर्य अस्ताला गेला त्या दिशेला क्षितिजाच्या कडांना अजूनहि प्रकाश रेंगाळत होता. व त्यांत मावळत्या सूर्याच्या किरणांची तांबूस छटा मिसळलेली होती. उलट दिशेला मात्र निळसर करड्या रंगाचा काळोख

पसरला होता. रात्रीच्या आगमनाची जणु ती चाहूल होती. शेंकडों पक्षांच्या किलबिलाटानें वातावरण भरून गेलें होतें, पण तो आवाज गेरासिमच्या कानांत शिरूं शकत नव्हता. वृक्षांची कुजबुजहि त्याला ऐकूं येत नव्हती. पण बाजूच्या शेतांतील कांपणीला आलेल्या पिकांचा परिचित वास त्याला धुंद करून सोडीत होता. विरुद्ध दिशेनें येणारा वाराहि त्याच्या चेहऱ्याशीं व केसांशीं खेळत तो त्याच्या गांवचा वारा असल्याची सुखद ओळख पटवीत होता. समोर अंधुक दिसणारा रस्ता तीरासारखा सरळ आपल्या गांवीं पोंचविणार असल्याची जाणीवहि त्याला मोठी आल्हाददायक वाटत होती. आकाशांत वर येऊं लागलेल्या असंख्य तारकांच्या प्रकाशांत तो एखाद्या सिंहासारखा वेगानें व उत्साहानें पावलें टाकीत होता. आणि सबंध रात्र वाट चालून पहांटच्या सूर्याचे कोवळे किरण त्या धिप्पाड वाटसरूचा देह न्हाऊन काढूं लागले तेव्हां तो व मॉस्को यांच्यांत चांगलें पस्तीस वेर्स्त अंतर पडलें होतें...

दोन दिवसांच्या वाटचालीनंतर तो गांवीं, आपल्या झोपडीसमोर येऊन थडकला. त्याच्या गैरहजेरींत एका शिपायाची बायको तेथें राहूं लागली होती. ती त्याला पाहून चकितच झाली. घरांतल्या देवाच्या मूर्तीसमोर हात जोडून प्रार्थना केल्यावर तो गांवच्या प्रमुखाला भेटण्यास गेला. गेरासिमला पाहून त्याला आश्चर्यच वाटलें, पण तो गवत कांपणीचा हंगाम होता व गेरासिम कामाला वाघ असल्याचें ठाऊक असल्यामुळें लगेच एक कोयता हातीं देऊन त्याला कामाला लावण्यांत आलें. इतक्या दीर्घावधीनंतर हातीं कोयता धरला तरी तो पूर्वीच्याच सफाईनें व चपळाईनें भराभर गवत कांपून त्याचे भारे जमवूं लागला तेव्हां सगळेजण कौतुकानें व आश्चर्यानें कांहीं वेळ त्याच्याकडे नुसते पाहतच राहिले...

गेरासिम मॉस्कोंतून निघून गेला त्याच्या दुसऱ्या दिवशीं त्याचा शोध सुरू झाला. त्याचा पत्ता लागेना, तेव्हां गाव्रिलोला कळविण्यांत आलें.

26633
262
24/3/60

तो स्वतः गेरासिमच्या खोलींत जाऊन आला व स्वतःशींच आश्चर्य करीत त्यानें ठरवून टाकलें कीं गेरासिम एक तर पळून गेला असावा किंवा त्या कुतरड्याबरोबर त्यानें स्वतःहि नदीचा तळ गांठला असावा. गेरासिम बेपत्ता झाल्याचें पोलिसांना व मालकिणीलाहि कळविण्यांत आलें. ती बातमी ऐकून मालकिणीचें पित्त खवळलें, संतापानें ती ओरडूं व रडूं लागली. तिनें गेरासिमला असेल तेथून शोधून आणण्याचा हुकूम सोडला. नंतर ती म्हणूं लागली कीं मी त्या कुत्रीचा जीव घ्या असं कधींच सांगितलं नव्हतं ! तिनें गाव्रिलोवर असं तोंडसुख घेतलं कीं तो सर्दच झाला व अखेर मान हालवून "हं ! ठीक !" म्हणून तिच्यासमोरून निघून गेला. तो सारा दिवस बेचैन होता आणि ख्वोस्तकाकानें "हं ! ठीक !" म्हणून त्याचें सांत्वन करीपर्यंत त्याला कांहीं सुचत नव्हतें !

गेरासिम सुखरूप गांवीं जाऊन पोंचल्याची वार्ता यथाकाल मॉस्को पर्यंत येऊन थडकली. मालकिणीचें खवळलेलें पित्त शांत झालें व तिनें एकदम गेरासिमला पुनः मॉस्कोला आणण्याचा हुकूम सोडला. पण दुसऱ्याच क्षणीं 'या असल्या कृतघ्न माणसाचा इथें काय उपयोग' असें म्हणून तिनें पहिला हुकूम रद्द केला.

थोड्याच दिवसांत ती मालकीण हा लोक सोडून गेली. तिच्या वारसांना सगळ्या मालमत्तेच्या व्यवस्थेच्या गर्दीत गेरासिमसारख्या क्षुल्लक गुलामाची आठवण करण्यालाहि सवड नव्हती. फार काय त्यांनीं वाड्यांतल्या इतर गुलामांना सुद्धां खंडणीच्या मोबदल्यांत दास्यत्वांतून मुक्त करून टाकलें.

गेरासिम मात्र अजूनहि एकटाच आपल्या झोपडींत राहतो. तो अजूनहि पूर्वींसारखा धिप्पाड व ताकदवान आहे. अजूनहि तो चार माणसांचं काम एकटा उरकतो. अजूनहि तो पूर्वींसारखा संथ व गंभीरपणें काम करतो. परंतु तो मॉस्कोहून परत आल्यापासून त्याच्यांत एक निश्चित

फरक पडल्याचें शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं पाहिलें आहे. गेरासिम आतां बायकांच्या वाऱ्याला उभा राहत नाहीं व कुत्राहि पाळीत नाहीं.

आसपासचे शेतकरी आपापसांत कधीं या विषयाची चर्चा करतांना म्हणतात; " तो स्त्रियांच्या वाटेला जात नाहीं हें त्याच्यासारख्याच्या दृष्टीनें हिताचेंच आहे! आणि तो कुत्रा बाळगीत नाहीं हेंहि ठीकच आहे. करायचाय काय त्याला कुत्रा? एखाद्या चोराला तुम्ही जबरदस्तीनें त्याच्या आवारांत नेऊन सोडलं तरी तो चोर स्वतः होऊनच तिथून पळ काढील!"

त्या मुक्याच्या प्रचंड सामर्थ्याची कीर्ति ही अशी सगळीकडे पसरली आहे!

IRBK-0106966